पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २०७ ■ मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

Dr. Ravi V. Ganeshkar
M.B.B.S., M.S. (ENT)
Fellow Head & Neck Oncosurgery
फेलो हेड अँड नेक ओंकोसर्जरी
थायरॉइड सर्जरी आणि संबंधित थायरॉइड कॅन्सरचे विशेषज्ञ
मास्टर ऑफ सर्जरी, नाक, कान, गला संबंधित कर्करोग तज्ञ
Mob : 0721-2571357, 9326609901
Address: Gete Life Hospital, Near Maratha Friends, Vijay Colony, 19 No. School Beside, Rukhmini Nagar, Amravati

# ऑपरेशन लोटसचा भाग आहे का ? – संजय राऊत म्हणाले

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**मुंबई :** अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात विविध दावे-प्रतिदावे वेगाने पुढे येत आहेत. विशेषतः दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुन्हा एकत्र येणार असल्याच्या चर्चांनी वातावरण ढवळून निघाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना नेते संजय राऊत यांनी पत्रकारांशी बोलताना काही गंभीर मुद्दे उपस्थित केले. अजित पवार हे भाजपच्या कथित भ्रष्टाचाराबद्दल खुलेपणाने बोलत होते, असे सांगत त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेत कुत्र्यांच्या नसबंदीच्या कामातील गैरव्यवहाराची माहिती दादांना असल्याचा दावा केला. अनेक वर्षे अर्थमंत्री म्हणून काम केल्यामुळे भाजपशी संबंधित अनेक बाबींची कागदपत्रे अजित पवार स्वतःकडे ठेवत, असा आरोपही राऊतांनी केला.

राऊतांनी पुढे म्हटले की, लोकसभेत राहुल गांधी यांना बोलू दिले गेले नाही, आणि अशा वातावरणात अजित पवार यांचा मृत्यू रहस्यमय वाटतो. दादांनी याआधी मी परत येण्यास तयार आहे, असे म्हटल्याचे जुने वक्तव्य त्यांनी आठवण करून दिले. जर अजित पवार पुन्हा शरद पवार यांच्या गटात गेले असते, तर भाजपच्या ऑपरेशन लोटसला मोठा धक्का बसला असता, असेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे दादांच्या अपघाताचे रहस्य लोकांसमोर आलेच पाहिजे आणि त्याची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

या संदर्भात राऊतांनी प्रफुल्ल पटेल यांच्यावरही टीका केली. दादांच्या निधनानंतर पक्षाध्यक्षपदाची घाई दिसत असल्याचा टोला त्यांनी लगावला. तसेच, जो भाजपच्या विरोधात जाईल तो एकतर जेलमध्ये जाईल किंवा त्याचा जीव जाईल, असे वक्तव्य करत त्यांनी राजकीय वातावरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या प्रफुल्ल पटेल आणि अमित शहा यांच्या छायाचित्रांचा उल्लेख करून त्यांनी संशय व्यक्त केला. याचवेळी नवाब मलिक यांच्याबाबत बोलताना, भाजप आणि एकनाथ शिंदे हे मलिक यांच्या नगरसेवकांभोवती फिरत असल्याचा आरोप त्यांनी केला. सावरकर सदनच्या मुद्द्यावरूनही त्यांनी भाष्य करत सध्याच्या राजकीय घडामोडींवर टीका केली.

दरम्यान, दादांच्या मृत्यूशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित करणाऱ्या काही बातम्या आणि चर्चांचाही उल्लेख राऊतांनी केला. मृतदेह जळाले, पण कागदपत्रं जळली नाहीत, कसं काय? असा प्रश्न उपस्थित करणारे दावे, तसेच या घटनेभोवती वाढत चाललेली चर्चा, यामुळे जनतेत उत्सुकता आणि संभ्रम वाढला आहे. अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्र अजूनही सावरलेला नाही, असे सांगत राऊतांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी होण्याची गरज पुन्हा अधोरेखित केली.

## अजित पवारांचा विमान अपघात







## भूकंप झाला तरी संजय राऊत ऑपरेशन लोटस म्हणतील : नवनाथ बन

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**मुंबई :** उद्या भूकंप झाला तरी संजय राऊत ऑपरेशन लोटसचा भाग आहे असे म्हणतील. स्वतः शरद पवारांनीही अजितदादांचा घातपात नसल्याचे सांगितले आहे. संजय राऊत यांनी आता नेटफ्लिक्सच्या वेबसीरिज लिहिण्याचे काम करावे, असे उत्तर भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी मंगळवारी दिले. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी पुन्हा एकदा अजित पवारांच्या घातपातावर संशय व्यक्त केला होता. अजित पवारांचा विमान अपघात ऑपरेशन लोटसचा भाग आहे का?, असा सवाल राऊत यांनी केला होता. तसेच भाजपच्या विरोधात जाणारा एकतर जेलमध्ये जातो, नसता जीव जातो, असा आरोपही त्यांनी केला. याला नवनाथ बन यांनी प्रत्युत्तर दिले.

नवनाथ बन म्हणाले, 'उद्या भूकंप झाला तरी संजय राऊत ऑपरेशन लोटसचा भाग आहे असे म्हणतील. उद्या जर त्सुनामी आली तरी संजय राऊत ऑपरेशन लोटसचा भाग म्हणतील. उद्या पूर आली तरी संजय राऊत ऑपरेशन लोटसचा भाग म्हणतील. त्यांनी ऑपरेशन लोटसचे नाव घेण्याऐवजी त्यांच्याकडे काही पुरावे असतील तर ते सादर केले पाहिजे,' असे आव्हान त्यांनी दिले. नवनाथ बन म्हणाले की, ' शरद पवारांनीही अजितदादांचा घातपात नसल्याचे सांगितले आहे. संजय राऊत प्रत्येक गोष्टीचा संबंध भाजपसोबत लावण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी उद्यापासून खासदारकी आणि राजकारण सोडून स्क्रिप्ट लिहिण्याचे काम केले पाहिजे.

## विमान अचानक पलटी कसे झाले

**नाशिक :** अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. राष्ट्रवादीचे अनेक नेते अजूनही या धक्क्यातून स्वतःला सावरून शकलेले नाहीत. अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राज्यातील राजकीय चित्र बदलले आहे. या घटनेची चौकशी डीसीजीएकडून सुरु असली तरी अपघाताविषयी काही महत्वाचे प्रश्न नेत्यांकडून उपस्थित केले जात आहे. आता राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ यांनी विमान अपघातविषयी शंका उपस्थित करत, 'विमान अचानक पलटी कसे झाले, काहीतरी गडबड आहे,' असे मोठं विधान करत शंका उपस्थित केली आहे. नाशिक येथे शोकसभेत भुजबळांनी उपस्थित केलेल्या शंकेमुळे विमान अपघाताविषयी शंकांचे गारूड वाढताना दिसत आहे. देशात अनेक विमान अपघात झाले. परंतु महाराष्ट्रात अशाप्रकारचा भयानक अपघात पहिल्यांदा झाला. मी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी केली तेव्हा हे विमान इथं आले कसं काय? हे कळेना.

## जड अंत : करणाने अजितदादांच्या अस्थिकलशाचे दर्शन

◆ अकोल्यात शोकाची लाट, राजकीय वर्तुळात हळहळ



प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अकोला :** राज्याच्या राजकारणात नेतृत्वाचा, लोकहिताच्या कार्याचा ठसा उमटवणारे आणि कार्यकर्त्यांच्या हृदयात घर करणारे नेते अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर संपूर्ण राज्य शोकसागरात बुडाले आहे. आज अकोला शहरात त्यांच्या अस्थिकलशाचे आगमन होताच वातावरण भावनांनी दाटून आले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महानगर कार्यालयात अस्थिकलश ठेवण्यात आला असता, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी अश्रुपूर्ण डोळ्यांनी दर्शन घेत दादांना अखेरचा मानाचा मुजरा केला.कार्यालय परिसरात काही काळ स्तब्धता पसरली होती. 'दादा परत येणार नाहीत' ही भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. अनेक कार्यकर्त्यांनी दादांसोबतच्या आठवणी सांगताना अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महानगराध्यक्ष विजयभाऊ देशमुख यांच्या नेतृत्वाखाली श्रद्धांजली कार्यक्रम पार पडला. 'अजितदादा हे केवळ नेते नव्हते, तर निर्णयक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्वाचे प्रतीक होते. त्यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे,' अशा शब्दांत भावना व्यक्त करण्यात आल्या.राजकीय पटलावर ठाम भूमिका, जलद निर्णयक्षमता आणि संघटन कौशल्य यासाठी ओळखले जाणारे दादा आज नसल्याची जाणीव प्रत्येकाला अस्वस्थ करून गेली. 'नेतृत्व हरपलं, आधार हरपला' अशी भावना कार्यकर्त्यांतून व्यक्त होत होती. यावेळी फैयाज खान, याकूब पैलवान, माजी नगरसेवक मनोज गायकवाड, नितीन झापर्डे, गौतम गवई, युवक अध्यक्ष अजय मते, बुढन गाडेकर, देवानंद ताले, सुधीर कहाकर, सुषमाताई निचळ, सुनिता ताथोड, अशोक परळीकर, बाळू नेरकर, मुन्ना ठाकूर, सोनू पठाण, सय्यद वसीम, गौतम चव्हाण, अब्दुल नइम, अश्विनी यादमराळे, नितीन क्षीरसागर, अतुल वसतकार, अजय कांबळे, दिलीप देशमुख आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## महापौर शारदा खेडकर, उपमहापौर अमोल गोगे यांचे पदग्रहण



प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अकोला :** भाजपच्या ज्येष्ठ नेत्या सुहासिनीताई धोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज शहर सुधार आघाडीच्या महापौर शारदा खेडकर आणि उपमहापौर अमोल गोंगे यांनी पदग्रहण केले. यावेळी आमदार वसंत खंडेलवार, माजी महापौर व किंगमेकर विजय अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. शहर सुधार आघाडीच्या महापौर शारदा खेडकर आणि उपमहापौर अमोल गोगे यांचा सोमवारी सायंकाळी महापालिकेत पदग्रहण सोहळा झाला. यावेळी ज्येष्ठ भाजप नेत्या सुहासिनीताई धोत्रे यांची उपस्थिती होती. यावेळी महापौरांना शुभेच्छा देण्यासाठी शहर सुधार आघाडीचे प्रमुख पदाधिकारी गटनेता, मित्र पक्षाचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती. भाजप आमदार वसंत खंडेलवाल, माजी महापौर विजय अग्रवाल, जयंत मसने यांची प्रमुख उपस्थिती होती. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे यांच्यासह शहर सुधार आघाडीचे प्रमुख सदस्य उपस्थित होते. भाजप गटनेता पवन महल्ले यांची उपस्थिती होती. महापौरांच्या पदग्रहणानंतर उपमहापौरांनी पदग्रहण करत शहर विकासासाठी कटिबध्द असल्याचे सांगितले.

## दुचाकी अपघातात एक जण ठार, एक गंभीर

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**खामगाव :** बुलढाणा रोडवरील ग्राम निंबारी नजीक असलेल्या राजवीर पेट्रोल पंपा समोर दोन दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या धडकेत एक जण जागीच ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी साडेसात वाजे दरम्यान घडली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, शेख जावेद शेख हनीफ वय ३५ हा दुचाकी क्रमांक एम एच २८ के ४३९५ या दुचाकीने मलकापूर येथून डिलक्स फर्निचर येथून कारपेंटर चे काम आटोपून सात वाजे दरम्यान राजुर ता. बुलढाणा कडे जात असताना निंबारी फाट्या नजिक बुलढाणा रोडवरील राजवीर पेट्रोल पंपा समोर एम एच १९ ण्ण्६०२ या दुचाकीने दाताळा कडून मलकापूर कडे येत असतांना दोन्ही दुचाकीची समोरासमोर धडक झाली.

या धडके राजूर तालुका बुलढाणा येथील शेख जावेद शेख हनीफ उपस्थित याचा जागीच मृत्यू झाला तर दुसऱ्या दुचाकी वरील सागर सुधीर झांबरे वय ३६ रा. मुक्ताईनगर जि.जळगांव हा गंभीर जखमी झाला, अपघात ग्रस्तांना दाताळा येथील पत्रकार विलास खर्चे, सोनू राजपूत, तुषार पाचपोळ, रोशन देशमुख, गोलू गुडगिल्ला, जयसिंग राठोड सह आदिंनी मलकापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले अपघाताची माहिती मिळता बरोबर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, ॲड हरीश रावळ, नगरसेवक जाकीर मेमन सह आदिंनी रुग्णालयात धाव घेतली. गंभीर जखमी सागर सुधीर झांबरे वय ३६ रा. मुक्ताईनगर यास मलकापूर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांची कारवाई केली.

## बनावट जन्म व मृत्यू नोंदींच्या आधारे पासपोर्ट, शासकीय लाभ व बेनामी फंड ट्रान्स्फर

◆ भाजपा नेते किरीट सोमय्या यांचा आरोप

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जिल्ह्यातील शेंदूर सनी व भवानी या गावांमध्ये बनावट जन्म व मृत्यूच्या नोंदी आढळून आल्याने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले असून, या बनावट नोंदींच्या आधारे पासपोर्ट काढणे, शासकीय लाभ मिळवणे तसेच बेनामी पद्धतीने फंड ट्रान्स्फर करण्यात येत असल्याचा गंभीर दावा भाजपाचे नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर सोमय्या यांनी आज यवतमाळ येथील जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देत जिल्हाधिकारी विकास मीना यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या प्रकरणामागे संघटित रॅकेट कार्यरत असून, त्याचे जाळे केवळ यवतमाळपुरते मर्यादित नसून महाराष्ट्रासह इतर राज्यांपर्यंत पसरले असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.



पोलिस तपासात या बनावट नोंदींच्या आधारे विविध प्रकारचे गैरव्यवहार करण्यात आल्याचे समोर येत असून, काही प्रकरणांमध्ये या कागदपत्रांचा वापर संशयास्पद आर्थिक व्यवहारांसाठी झाल्याची माहिती मिळत आहे. तसेच, या माध्यमातून स्लीपर सेलसाठी व्यक्ती तयार केल्या जात आहेत का, अथवा अतिरेकी कारवायांसाठी याचा वापर होत आहे का, याचीही सखोल चौकशी होणे गरजेचे असल्याचे सोमय्या यांनी सांगितले.

या संपूर्ण प्रकरणाचा तपास केवळ स्थानिक पातळीवर न करता राज्य पोलीस महासंचालकांच्या स्तरावरून करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. दोषींवर कठोर कारवाई करून या रॅकेटमधून नेमके लाभार्थी कोण आहेत, याचा शोध घेण्यात यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, एसआयटीमार्फत तपास सुरू असून, गेल्या काही दिवसांपूर्वी पथकाने यवतमाळमध्ये आढावा बैठक घेतली होती. या प्रकरणामुळे प्रशासन व सुरक्षा यंत्रणांसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'श्री'च्या प्रगटदिन उत्सवाला महारूद्रस्वाहाकार यागाने आरंभ





प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**खामगाव :** चला हो शेगावी जाऊ जिवाचा जिवलगा पाहू...

श्री संत गजानन महाराज संस्थान मध्ये श्रींचा प्रगट दिन उत्सव सोमवारी सकाळी महारूद्रस्वाहाकार यागाने झाला. भाविकांनी श्रींच्या दर्शनासाठी गर्दी केली आहे.

श्री संत गजानन महाराज मदिरात सात दिवस विविध धार्मिक विधी सुरू झाले आहे. महारूद्रस्वाहाकार यागाचे पूजन बीड जिल्ह्यातील वेदमूर्ती ब्राह्मणवृंदाद्वारे करण्यात आले. आहे आज श्रींच्या मंदिरात सजावट केली आहे. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता श्री महारूद्रस्वाहाकार यागाची पुर्णाहूती, अवभृतस्नान होईल. दुपारी ४ वाजता पालखी अश्वरथ, मेणासह परिक्रमा करीता निघेल. ९ फेब्रुवारीला ह.भ.प. रविंद्रबुवा हरणे श्री क्षेत्र मुक्ताईनगर यांचे सकाळी ७ ते ८ काल्याचे कीर्तन होईल. या प्रगटदिन उत्सावाची सांगता होणार आहे. श्री प्रगटदिन उत्सवात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र, मध्यप्रदेश या ठिकाणाहून भजनी दिंडया दाखल होत आहे. गजानन अवलीया अवतरले जग तराया, ज्ञानेबुवा तुकाराम नामघोष करित शेगांव शहरात भजनी दिंडयाचे आगमन होत आहे. श्रींच्या प्रगटदिन उत्सवानिमित्त सहभागी होणाऱ्या भजनी दिंड्यांच्या ज्ञानोबा राया माझ्या तुकोबाराया गजानना अवलिया अवतरले जग ताराय या नामघोषाने संत नगरी भक्तीमय झाले आहे. श्रींच्या प्रगट दिन सप्ताहामध्ये राज्यातील हजारो भाविक श्रीच्या समाधी मंदिराचे दर्शन घेणार आहेत.

**विद्युत रोषणाई....**

◆ श्री संस्थान मध्ये प्रगटदिनाच्या निमित्ताने श्रींच्या समाधी मंदिरावर, परिसरात पिवळया रंगाची विद्युत रोषणाई व तर प्रवेशद्वारावर रंगीबेरंगी आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

## हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**छत्रपती संभाजीनगर :** भाजप नेत्या व राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये आज तांत्रिक बिघाड झाल्याची घटना उघडकीस आली आहे. छत्रपती संभाजीनगर येथून लातूरकडे उड्डाण घेण्याच्या तयारीत असताना वैमानिकाच्या सतर्कतेमुळे हा बिघाड वेळेत लक्षात आला यामुळे मोठी दुर्घटना टळली. सध्या पंकजा मुंडे मराठवाड्यात जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचार दौऱ्यावर आहेत. आज लातूर जिल्ह्यात विविध ठिकाणी त्यांच्या प्रचारसभा नियोजित होत्या. त्यासाठी त्या छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून हेलिकॉप्टरने लातूरकडे रवाना होणार होत्या.



सिटी न्यूज अमरावती
मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# मोर्शी अमरावती महामार्गावर बसच्या धडकेत मजूर ठार

**मोर्शी :** मोर्शी अमरावती महामार्गावर सावरखेड ते गोराळा दरम्यान एका एसटी बसच्या धडके एका मजुराचा जागीच मृत्यू झाला मोनू उईके वय ४५ राहणार पिंपरी ढाणा, तालुका भैसदेही, जिल्हा बैतूल मध्य प्रदेश असे मृत मजुराचे नाव आहे. या घटनेनंतर बस चालक विशाल अमझरे याने अपघातग्रस्त बस शिरखेड पोलीस ठाण्यात जमा केली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मोर्शी तालुक्यातील सावरखेड येथील मोर्शी अमरावती महामार्गावरील पेट्रोल पंपाजवळ थ्रेशर मशीन वर काम करणारे काही मजूर ट्रॅक्टर मध्ये डिझेल भरण्यासाठी थांबले होते मोनू उईके हा त्यावेळी मुख्य रस्त्यावर उभा होता अमरावतीहून मोर्शी कडे जाणाऱ्या एका एसटी बसने त्याला धडक दिली या धडकेत मोनू उईके याचा घटनास्थळी मृत्यू झाला त्याला तात्काळ मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले या घटनेनंतर बस चालक विशाल अमझरे यांनी स्वतः अपघातग्रस्त बस शिरखेड पोलीस ठाण्यात जमा केली शिरखेड पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# श्रीचंद तेजवानी महापौर तर सचिन भेंडे होणार उपमहापौर

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अमरावती :** अमरावती महापालिकेत भाजप, युवा स्वाभिमान पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिंदेसेना अशाप्रकारे महायुतीच्या सत्ता स्थापनेच्या निर्णयावर एकमत झाले आहे. पहिल्या टप्प्यात भाजपचे महापौर श्रीचंद तेजवानी तर दुसऱ्या टप्प्यात आशिष अतकरे हे सव्वा-सव्वा वर्षासाठी महापौरपदाची धुरा सांभाळतील. अशाच प्रकारे युवा स्वाभिमान पक्षाचे उपमहापौर सचिन भेंडे आणि अजय जयस्वाल हे सव्वा-सव्वा वर्षासाठी उपमहापौरपदाचा कारभार हाताळणार आहेत. भाजप आणि युवा स्वाभिमान पक्षात तसा राजकीय करारनामा झाला आहे. महापौर, उपमहापौरपदाची निवडणूक ६ फेब्रुवारी रोजी होणार असून सोमवारी तेजवानी, भेंडे यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे.



**भाजप नगरसेवकांच्या बैठकीत निर्णय**

भाजपचे महापौरपदाचे उमेदवार ठरविताना नगरसेवकांची मते जाणून घेण्यात आली. कोअर कमिटीने जिल्हा स्टेडियम प्रभागातील श्रीचंद तेजवानी आणि गडगडेश्वर प्रभागातील आशिष अतकरे यांच्या नावावर सव्वा-सव्वा वर्षासाठी महापौरपदाचा फॉर्म्युला मांडला. याविषयी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी घेतलेला निर्णय कोअर कमिटीने सांगितला. यावेळी आमदार संजय कुटे, भाजपचे विदर्भ संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर, आमदार प्रताप अडसड, भाजपचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, किरणताई महल्ले, शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, चेतन पवार, रवींद्र खांडेकर, तुषार भारतीय, ॲड. प्रशांत देशपांडे, संजय तिरथकर, सुनील खराटे, किरण पातूरकर आदी उपस्थित होते.



अमरावती महापालिकेत २२ प्रभागातून ८७ नगरसेवक निवडून आले आहेत. कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यामुळे कुबड्या घेऊनच सत्ता स्थापन करावी लागत आहे. भाजप २५ जागांवर विजय मिळवत सर्वात मोठा पक्ष म्हणून नावारूपास आलेला आहे; परंतु सत्ता स्थापन करताना मित्र पक्ष असलेल्या युवा स्वाभिमान पक्ष, शिंदेसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांची मदत घ्यावी लागत आहे. भाजप २५, युवा स्वाभिमान १५, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) ११, शिंदेसेना ३ असे एकूण ५४ सदस्य संख्या होत आहे. महापौर, उपमहापौर पदाच्या निवडीसाठी हे संख्याबळ पुरेसे ठरणारे आहे; मात्र राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाने भाजपसोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे.

# उत्कृष्टतेचा सन्मान! डॉ. सोळंके, जुनघरे आणि पंजाबी 'वॉल ऑफ फेम'वर गौरवले

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अमरावती:** उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात डॉ. सोंळके, जुनघरे आणि पंजाबी यांना 'वॉल ऑफ फेम'वर मानाचा गौरव देण्यात आला. सीईओंच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. संस्थेच्या प्रगतीत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या कार्याची दखल घेणे, हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमात संस्थेतील विविध विभागांतील कर्मचारी, अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. उत्कृष्ट कार्यशैली, सातत्यपूर्ण कामगिरी, नवकल्पना आणि जबाबदारीने पार पाडलेल्या कामासाठी निवड समितीने या तिघांची निवड केली. 'वॉल ऑफ फेम'वर नाव कोरले जाणे हा केवळ सन्मान नसून इतर कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा क्षण असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



सीईओंनी आपल्या भाषणात सांगितले की, संस्थेची यशस्वी वाटचाल ही टीमवर्कवर अवलंबून असते. डॉ. सोंळके, जुनघरे आणि पंजाबी यांनी आपल्या कार्यातून गुणवत्ता, शिस्त आणि निष्ठेचा आदर्श निर्माण केला आहे. अशा कर्मचाऱ्यांचा गौरव केल्याने संस्थेतील सकारात्मक वातावरण अधिक बळकट होते आणि सर्वांनाच अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते.

सन्मान स्वीकारताना गौरवप्राप्त कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त करत संस्थेने दिलेल्या संधी आणि सहकाऱ्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. भविष्यातही अधिक जबाबदारीने काम करून संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी योगदान देण्याचा निर्धार त्यांनी यावेळी केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी गौरवप्राप्त कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. 'वॉल ऑफ फेम' उपक्रमामुळे गुणवत्तेची कदर होत असून, अमरावतीतील कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

# विकसित भारताचे स्वप्न साकार करणारा अर्थसंकल्प - प्रविण पोटे पाटील

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अमरावती:** विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सादर करण्यात आलेला हा अर्थसंकल्प अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिशादर्शक ठरणारा आहे. शहरीकरणाला नियोजनबद्ध दिशा देत, उद्योग-उद्योजकतेला चालना देण्यावर आणि गुंतवणूक व रोजगारनिर्मितीसाठी ठोस उपाययोजनांवर या अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे. पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी १२ लाख कोटी रुपयांची तरतूद आर्थिक विकासाला गती देणारी ठरेल.



शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन या क्षेत्रांसाठी करण्यात आलेल्या भरीव तरतुदी ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देतील. 'लखपती दिदी' योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी निर्माण करण्याचा निर्णय महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने मोलाचा ठरेल. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना शिक्षणातील समान संधी वाढवणारी आहे. तसेच जिल्हा रुग्णालयांमध्ये आपातकालीन वैद्यकीय सेवा उभारण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोठा बदल घडवून आणणारा ठरेल.

एकूणच, हा अर्थसंकल्प भारताला विकसित राष्ट्राच्या दिशेने नेणारा आहे.

# चाकूचा धाक दाखवून घरफोडी; दागिने लुटणाऱ्या टोळीला पोलिसांचा दणका

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अमरावती :** चाकूचा धाक दाखवून घरात घुसून दागिने लुटणाऱ्या चोरट्यांच्या टोळीला पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत एक आरोपी मध्यप्रदेशातून अटक करण्यात आला असून, त्याच्या दोन साथीदारांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपींनी घरात घुसून रहिवाशांना चाकूचा धाक दाखवत दागिने लुटल्याची घटना उघडकीस आली होती. या प्रकरणाचा तपास सुरू असताना पोलिसांनी तांत्रिक माहिती आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपींचा शोध घेतला. त्यानुसार मुख्य आरोपी मध्यप्रदेशात लपल्याचे समोर येताच पोलिसांनी तेथे जाऊन त्याला अटक केली.


त्यानंतर त्याच्या चौकशीतून उर्वरित दोन आरोपींची माहिती मिळाली. त्यानुसार दोघांनाही अटक करण्यात आली. पोलिसांनी आरोपींकडून लुटलेले दागिने जप्त केले असून, पुढील तपास सुरू आहे.

# समृद्धी शेत पांदन रस्ते व जल पुनर्भरण योजनेची अंमलबजावणी सुरू

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अमरावती :** जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांच्या दळणवळणाची समस्या सोडविण्यासाठी आणि पाणी साठा वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. संपूर्ण जिल्ह्यात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समृद्धी शेत पांदन रस्ते व जल पुनर्भरण योजना' राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये बारामाही शेत रस्ते तयार करण्यात येणार असून, यासाठी स्थानिक नदी व नाल्यांमधील गाळ व साहित्याचा वापर केला जाणार आहे, यामुळे जलस्त्रोतांचे खोलीकरण होऊन पाणी पातळी वाढण्यास मदत होणार आहे. योजना लोकसहभाग आणि शासकीय निधीच्या संयुक्त विद्यमाने राबविली जाणार आहे. योजनेसाठी प्रति किलोमीटर ९ लाख रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आला असून, त्यापैकी ७.५ लाख रुपये शासन देणार आहे, तर उर्वरित १.५ लाख रुपये संबंधित अशासकीय संस्थेला लोकसहभागातून उभे करावे लागणार आहेत. या कामासाठी रस्ते बांधणीचा अनुभव असलेल्या सेवाभावी संस्थांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत. निवड झालेल्या संस्थांसोबत जिल्हाधिकारी कार्यालय सामंजस्य करार करणार आहे. या योजनेमुळे शेत रस्त्यांवरील अतिक्रमणे दूर होऊन शेतकऱ्यांचा माल बाजारपेठेपर्यंत नेणे अधिक सुलभ होईल, असे उपजिल्हाधिकारी रोहयो यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# संत रविदास महाराज यांना विभागीय आयुक्तालयात अभिवादन



प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अमरावती :** संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्तालयात आज सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी विभागीय आयुक्तालयातील उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनीही संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले.

# रेकॉर्डवरील गुन्हेगारास दोन तलवारीसह दहशत पसरवित असतांना ताब्यात घेतले

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अमरावती :** पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी अमरावती शहरात अवैध्यरीत्या शस्त्र बाळगणा-या इसमांवर कारवाई करण्याबाबत आदेशीत केलेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे.

आज दिनांक ०२.०२.२०२६ रोजी गुन्हे शाखा येथिल पथक अवैध्यरीत्या शस्त्र बाळगणा-या इसमांवर कारवाई करणेकरीता पेट्रोलींग करीत असतांना गुप्त माहीती प्राप्त झाली की, एक रेकॉर्डवरील गुन्हेगार आपले हातात दोन लोखंडी धारदार तलवारी असे घातक शस्त्र घेवुन कपीलवास्तु नगर अमरावती लोकांना धाक दाखवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने दहशत पसरवित आहे अशा मिळालेल्या माहीती वरून पो.नि. संदीप चव्हाण, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा येथिल पथकाने सदर रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे प्रफुल सागर वानखडे वय २१ वर्ष रा. कपीलवास्तु नगर अमरावती यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन दोन धारदार लोखंडी तलवारी जप्त करून सदर इसमा विरुध्द पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे कलम ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव प्रफुल सागर वानखडे वय २१ वर्ष रा. कपीलवास्तु नगर अमरावती असे असून त्याच्याकडून जप्त करण्यात आलेला मुददेमाल दोन लोखंडी धारधार तलवारी कि.अ. ३,०००/- रू. सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे), रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे, यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात स.पो.नि. महेश इंगोले, पोलीस अंमलदार पोहेका गजानन ठेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, मंगेश परिमल, विशाल वाकपांजर, नापोका मिर्झा नईम बेग, विकास गुडधे, पोकॉ सागर ठाकरे, योगेश पवार, पोहेका संदीप खंडारे यांनी केली आहे.

# अमरावती शहरातील जुना रेल्वे उड्डाणपूल पुनर्बांधणीच्या प्रक्रियेत

**♦ लोकसभेत खासदार बळवंत वानखडे यांनी मुद्दा उपस्थित केल्यानंतर रेल्वे राज्यमंत्र्यांची माहिती**

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अमरावती:** शहरातील जुन्या रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीचा प्रश्न खासदार बळवंत वानखडे यांनी ५ डिसेंबर २०२५ रोजी लोकसभा येथे शून्य काल दरम्यान उपस्थित केला. या प्रश्नावर रेल्वे राज्यमंत्र्यांनी सविस्तर उत्तर देत सद्यस्थितीची माहिती दिली.

रेल्वे राज्यमंत्र्यांनी सांगितले की, ही मागणी बडनेरा–अमरावती विभागातील किमी ६७१/१४-१५ येथे असलेल्या जुन्या रोड ओव्हर ब्रिज (आरओबी) च्या पुनर्बांधणीसंदर्भातील आहे.



हा दोन पदरी आरओबी सन १९६३ मध्ये बांधण्यात आला होता.

राज्य प्रशासनाने नेमलेल्या त्रयस्थ संस्थेने केलेल्या संरचनात्मक सुरक्षा मूल्यांकनाच्या अहवालाच्या आधारे, राज्य सरकारने २५ ऑगस्ट २०२५ पासून या उड्डाणपुलावरील सर्व प्रकारची वाहतूक बंद केली आहे. पुलाची संरचनात्मक स्थिती लक्षात घेता नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी हा निर्णय घेण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, या जुन्या उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यात आले असून, ते सध्या मंजुरीच्या प्रक्रियेत असल्याची माहिती रेल्वे राज्यमंत्र्यांनी लोकसभेत दिली. आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला गती दिली जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेशासाठी मार्गदर्शन कार्यक्रम

**♦ धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचा अभिनव उपक्रम**

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अमरावती :** आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी या प्रकल्पाव्दारे शासकीय, अनुदानित व एकलव्य मॉडेल स्कुल या शाळांमध्ये इयत्ता दहावी व बारावीमध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या सहाय्याने अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेश मिळविण्यासाठी नीट व सीईटी परीक्षांचे मार्गदर्शन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज संबंधित शाळामार्फत १५ फेब्रुवारीपर्यंत धारणी प्रकल्प कार्यालयास सादर करावी, असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी सिध्दार्थ शुक्ला यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

या योजने अंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दहावी उत्तीर्ण झालेले तसेच मार्च २०२६ मध्ये दहावीची परीक्षा देणारे विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावीत प्रवेश दिला जाईल. या कार्यक्रमांतर्गत इच्छुक विद्यार्थ्यांकडून NEET (नीट) व CET (सिईटी)/JEE (जेईई) या परीक्षांची तयारी करुन घेण्यात येईल. योजने अंतर्गत प्रशिक्षणाचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा, तसेच विद्यार्थ्याला अनुसूचित जमाती प्रर्वगाचा जातीचा दाखला प्रवेशावेळी सादर करणे बंधनकारक राहील. विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न आठ लाखापेक्षा कमी असावे. विद्यार्थी मार्च २०२६ मध्ये इयत्ता दहावीच्या परीक्षेला प्रविष्ठ असावा. चाळणी परीक्षा मे २०२६ मध्ये घेण्यात येईल.

विद्यार्थ्यांनी मार्गदर्शनपर प्रशिक्षणासाठी विहित नमून्यातील आवेदन पत्र दि. १५ फेब्रुवारीपर्यंत धारणी प्रकल्प कार्यालयास सादर करावीत. नमूद मुदतीनंतर प्राप्त होणारे आवेदन पत्र स्विकारल्या जाणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी व आवेदन अर्जाचा नमूना प्राप्त करण्यासाठी धारणी, प्रकल्प कार्यालयाशी प्रत्यक्षरित्या अथवा दूरध्वनी क्रमांक ०७२२६-२२४२१७ आणि poitdped.dharnied-mh@goved.in ईमेल यावर संपर्क साधावा, असेही प्रकल्प कार्यालयाव्दारे कळविण्यात आले आहे.

# 'ट्रॅक ॲण्ड ट्रेल'च्या माध्यमातून मेळघाटातील पर्यटनाचा विकास- जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अमरावती:** मेळघाटमध्ये निसर्ग सौदर्य अनुभवण्यासाठी पर्यटक येतात. याठिकाणी असलेल्या पर्यटनस्थळाशिवाय त्यांना जंगलातील भ्रमंती आणि निसर्गाशी एकरूप होण्याची सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. यासाठी ट्रॅक आणि ट्रेलसाठी मार्ग शोधण्यात येतील, यातून मेळघाटातील पर्यटनाचा विकास साधण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

मेळघाटातील पर्यटनाबाबत मेळघाट ॲडव्हेंचर क्लबने जिल्हाधिकारी कार्यालयात सादरीकरण केले. विदर्भातील वन पर्यटनामध्ये मेळघाट हा उत्तम पर्याय आहे. याठिकाणी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी



पर्यटनस्थळांच्या विकासासोबतच पर्यटनाचे विविध पर्याय देणे आवश्यक आहे. जंगल सफारी, साहसी पर्यटन यासह जंगल भ्रमंती हा पर्यायही देणे आवश्यक आहे. यासाठी वन विभागाने पर्यटकांची सुरक्षितता लक्षात घेऊन ट्रेकिंगसाठी मार्ग निवडावेत. आवश्यकता पडल्यास याठिकाणी स्वतंत्र गेट उभारण्यात यावे. याप्रकारचे पर्याय दिल्यास पर्यटक मेळघाटात थांबण्यास तयार होतील.

मेळघाटातील पर्यटनाबाबत युवकांना लक्ष ठेऊन समाजमाध्यमांवरून प्रसिद्धी करावी. यामुळे मेळघाटबाबत माहिती होण्यास मदत मिळणार आहे. शालेय विद्यार्थी आणि समूहाने येणारे पर्यटकांवर लक्ष केंद्रीत करावे. त्यांच्यासाठी निवास, फिरणे आणि जेवणाची उत्तम व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. पर्यटकांच्या निवासाची व्यवस्था उत्तम दर्जाची असावी. याठिकाणी स्वच्छता आणि निटनेटकेपणा असणे आवश्यक आहे. सेमाडोह आणि कोलकास येथे राहण्याची व्यवस्था आहे. याठिकाणांची देखभाल, दुरूस्ती सातत्याने करावी. इतर ठिकाणी टेंटमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात येते.

# सण उत्सव कालावधीत शहरात कलम ३८ लागू

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अमरावती:** जिल्ह्यात आगामी काळात सण, उत्सव साजरा होणार आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण पोलीस अधिनियमांतर्गत शहरात कलम ३८ लागू झाले आहे.

आगामी काळात विविध धर्मियांचे सण उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जातील. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ३८ नुसार सर्व ग्रामीण जिल्ह्यामध्ये परिसरातील व त्यांच्यावरील अधिकाऱ्यांना (पोलीस आयुक्तलांचे क्षेत्र वगळून) आजपासून, दि. २ फेब्रवारी ते ३१ डिसेंबर २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत अधिकार प्रदान करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक, अमरावती ग्रामीण विशाल आनंद यांनी दिले आहे.

रस्त्यावरून जाणारी मिरवणूक सुरळीत ठेवणे, उपासनास्थळी गर्दी होणार असेल किंवा अडथळ्याचा संभव असेल तर अडथळा होऊ न देणे, सर्व मिरवणूकाच्या व जमावाच्या प्रसंगी व पूजा-अर्चा या ठिकाणी कोणताही रस्ता किंवा अडथळा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा न होवू देण्यासाठी याठिकाणी बंदोबस्त ठेवणे, सर्व रस्त्यांवर किंवा रस्त्यात, इतर सर्व सार्वजनिक किंवा लोकांच्या येण्याच्या जागेमध्ये बंदोबस्त राहण्यासाठी, वाद्यांबाबत नियम व नियंत्रण ठेवणे, सार्वजनिक जागेत ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत नियम व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. यासाठी हे आदेश देण्यात आले आहेत.

सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# नरनाळा महोत्सव आता १५ ते १७ फेब्रुवारी दरम्यान

**अकोला:** नरनाळा महोत्सवासाठी आता दि. १५ ते १७ फेब्रुवारी या तारखा निश्चित करण्यात आल्या असून, जंगल सफारी, साहसी खेळ व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या समावेशासह महोत्सव घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे सांगितले. महोत्सवातून सातपुड्यात वसलेल्या मेळघाटचे वनवैभव, आदिम संस्कृतीचे दर्शन घडणार आहे. उत्सवात नौकाविहार, सफारी, आदिवासी नृत्यकला सादरीकरण, पक्षीनिरीक्षण, गड भटकंती, साहसी खेळ, छायाचित्र प्रदर्शन याबरोबरच अनेकविध सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन केले जाणार आहे. महोत्सवात प्रत्येक दिवशी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. 'चला हवा येऊ द्या', 'शिवशंभू गर्जना', तसेच प्रसिद्ध गायक कैलास खेर यांची 'लाईव्ह कॉन्सर्ट' असे नामवंत कलावंतांचा समावेश असलेले कार्यक्रम महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आहे. त्याचप्रमाणे, निसर्ग निर्वाचन संकुल, शहानुर येथे जंगल सफारी, ट्रेकिंग, व्हॅली क्रॉसिंग,रॅपलिंग, बोटिंग व झॉर्बिंग वॉटर बॉलचे आयोजन पोपटखेड धरण येथे करण्याचे नियोजन आहे.

## केशव नगर येथील देवी भागवत कथेची भक्तीभावात पूर्णाहुती



**अकोला:** श्री हरिहर सदगुरु शक्तीपीठ, संभाजी नगर संचालित संभाजीनगरच्या पू. गिरजामाता आईसाहेब यांच्या आशीर्वादाने व प पु सदगुरु पिठाधिश्वर श्री अप्पा महाराज यांच्या पावन स्मृतीत श्री जगदंब परिवार अकोलाच्या वतीने स्थानीय केशवनगर परिसरातील श्री मारुती मंदिर प्रांगणात सुरू असलेल्या भागवताचार्य पू अंबरीश महाराज जोशी सोनईकर यांच्या श्रीमद् देवी भागवत सप्ताहाचे सोमवारी भक्तीभावात समापन झाले.या समापन उत्सवात देवी भागवत कथा सांगता व पंचकुंडी यागाची पूर्णाहुती संपन्न झाली. यास महिला पुरुष भक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत या कथेत आपली उपस्थिती दर्शवित आयोजित महाप्रसादचा लाभ घेतला.दरम्यान या उत्सवात पंचकुडात्मक शतचंडी याग साकार करण्यात आला.

## वाईबीसीच्या क्रिकेट स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद




**अकोला:** औद्योगिक व सामाजिक सेवेत सक्रिय असणाऱ्या यंग इंडिया बिझनेस क्लब अर्थात् वायबीसीच्या वतीने बॉक्स क्रिकेट टूर्नामेंट घेण्यात आली ज्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. अरेना स्पोर्ट्स, रेल्वे कॉलनी परिसरात उत्साह आणि खेळाडू भावनेने संपन्न या स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रीय ध्वजाला सलाम देऊन सर्व खेळाडूंनी गायलेल्या राष्ट्रगीताने झाले. या स्पर्धेत एकूण ६ क्रिकेट संघांनी सहभाग घेतला. त्यात रमाकांत खेतान यांच्या खेतान स्ट्रायकर्स, आर. झेड. अग्रवाल यांच्या वायबीसी इंडिया, संदीप अग्रवाल यांच्या रौनक सेवन, शार्दूल दिगंबर यांच्या वैभव, मनोज अग्रवाल यांच्या युसुफ सेवन आणि अकोला लायन्स सफायर संघांचा समावेश होता.टूर्नामेंट नॉकआउट पद्धतीने खेळला गेला, ज्यात एकूण ६ सामने खेळण्यात आलेत.पहिल्या सेमीफायनलमध्ये वैभव आणि वायबीसी इंडियाचा सामना झाला, ज्यात वायबीसी इंडियाने विजय मिळवला. दुसऱ्या सेमीफायनलमध्ये रौनक सेवन आणि युसुफ सेवन यांच्यातील लढतीत रौनक सेवन विजेते ठरली.

# वडाळी देशमुखला सांस्कृतिक बालरंजनात चिमुकल्यांच्या नृत्यावर थिरकले शिक्षकांसह गावकरी

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी




**अकोट:** वडाळी देशमुख येथील प्राथमिक जिल्हा परिषद शाळेमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्ताने बालरंजन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शि. शा. स. अध्यक्ष मयूर पळसकार तर प्रमुख उद्घाटक सरपंच प्रवीण शिंगाडे, उपसरपंच प्रमोद खलोकार, तर प्रमुख अतिथी नगराध्यक्ष मायाताई धुळे, उपाध्यक्ष न.पा. आ.प्रथमेश बोरोडे, शि. वि.अधिकारी गजानन सावरकर , मुख्याध्यापक भास्कर इंगळे, सुशील लोणकर, पंकज महल्ले, पत्रकार पवन बेलसरे, केंद्रप्रमुख वंदनाताई नाथे, मुख्याध्यापिका ज्योतीताई इंगळे, शा. व्य. स. उपाध्यक्ष उज्वला अंभोरे, तर प्रमुख उपस्थितीत ग्रामपंचायत सदस्य भगवान चौधरी, सौ नीताताई बिलबिले, अश्विनीताई टोहरे, मंगलाताई वाहूरवाघ जगतचंद्र वाहूरवाघ, कल्पनाताई बोडखे, पांडुरंग रेवस्कर, पुनमताई जुनगरे, प्रभाकर बारब्दे तं.मु.अध्यक्ष, शा. व्य.स. सदस्य सुनंदाताई धांडे, हर्षल रामेकर, पुनमताई धनोकार, राहुल हुसे, मीराताई वाहूरवाघ, निलेश पटके, शारदाताई रेवस्कार, गौतम वाहुर वाघ, योगिताताई गोरडे, मुकुंद बिलबिले उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. सरपंच प्रवीण शिंगाडे, उपसरपंच प्रमोद खलोकार, नगराध्यक्ष मायाताई धुळे, उपनगराध्यक्ष प्रथमेश बोरोडे, पाहुण्यांचे शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शाळा समिती सर्व सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. एक ते सात वर्गांमधील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या एकूण ४३ गणेश वंदना, एकपात्री प्रयोग, मराठमोळे गाणे, शिवकन्या,फनी डान्स, भीम कन्या गीत, नशिबाचा वडापाव गोंधळ, मराठी रिमिक्स, कॉमेडी डान्स, कोळीगीत, ऑपरेशन सिंदूर ,अशा विविध नृत्य कला नाटिका ग्रुप डान्स सादरीकरण करण्यात आले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादरीकरणातून प्रेक्षकांचे मन जिंकून त्यांना बक्षीस देण्यात आली. मुख्याध्यापक भास्कर इंगळे, निवृत्ती राऊत, सुवर्णाताई शेगोकार, अर्चनाताई अस्वार, अनिताताई राऊत, शुभांगीताई सरनाईक , अनिल अकोटकार, प्रमिलाताई हिवसे, प्राजक्ताताई मुळे, तर सेवानिवृत्ती शिक्षक रवींद्र समदूर, सुधीर खोले, अनिल गोंडचर , कार्यक्रमाचे प्रास्ताविक भास्कर इंगळे यांनी केले तर सूत्रसंचालन अनिताताई राऊत व प्राजक्ताताई मुळे, तर आभार प्रदर्शन निवृत्ती राऊत यांनी केले.

# दर्यापूर - दहीहांडा - कुटासा - मार्गे शेगाव बस सेवा सुरू करण्याची मागणी

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी



**कुटासा:** दर्यापूर ते शेगाव दरम्यान दहीहांडा, कुटासा, कावसा मार्गे थेट बस सेवा सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात प्रवाशांची ये-जा होत असून विशेषतः विद्यार्थी, नोकरदार वर्ग तसेच व्यापारासाठी प्रवास करणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. सदर मार्गावर श्री. संत गजानन महाराज संस्थान शेगाव येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचीही मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र थेट बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकांना खासगी वाहनांवर किंवा बदलत्या बससेवांवर अवलंबून राहावे लागत असल्याने वेळ आणि खर्च दोन्ही वाढत आहेत. विशेष म्हणजे या संपूर्ण मार्गावरील रस्त्याचे काम आता पूर्ण झाले असून वाहतुकीसाठी रस्ता सुस्थितीत उपलब्ध आहे. त्यामुळे बस सेवा सुरू करण्यात कोणताही तांत्रिक अडथळा नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ही बस सेवा सुरू झाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सुरक्षित व सोयीस्कर प्रवास करता येईल, तसेच प्रवासी व भाविकांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. ही सेवा सुरु झाल्यास परिसरातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.निवेदन देताना कुटासा गावचे पोलीस पाटील गजानन उगले व पत्रकार कुशल भगत उपस्थित होते.

# अकोट नगर परिषदेचे प्रवेशद्वार व सभागृहाला महापुरुषांची नावे देण्याची मागणी

वि. प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोट :** महापुरुषांच्या विचारांचा वारसा कायम जपण्यासाठी अकोट नगर परिषदेच्या प्रवेशद्वार व सभागृहाला महापुरुषांची नावे देण्यात यावीत, अशी मागणी सम्राट युवाशक्ती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेने नगराध्यक्षा माया विवेक धुळे व मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांना २ फेब्रुवारी रोजी निवेदन सादर केले.

नगरपालिकेच्या प्रथम प्रवेशद्वाराला 'छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार', दुसऱ्या प्रवेशद्वाराला 'महात्मा ज्योतिराव फुले प्रवेशद्वार' तसेच नगरपरिषदेच्या सभागृहाला 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह' असे नामकरण करावे, असा ठराव येणाऱ्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूर करावा, अशी संघटनेची मागणी आहे.

निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांनी आदर्श स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरवली, तर महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील विषमता दूर करण्यासाठी आयुष्य वेचले. समाज सुशिक्षित, सुसंस्कृत व विकसित व्हावा यासाठी त्यांनी दिलेले योगदान प्रेरणादायी आहे.

हे निवेदन सम्राट युवाशक्ती संघटनेचे अध्यक्ष विशाल आग्रे यांनी दिले. यावेळी संघटनेचे अकोट तालुका अध्यक्ष गौतम वाहुरवाघ, धम्मध्वज गायकवाड, अशोक वाहूरवाघ, विनोद खंडारे, अमोल वानखडे, यश तेलगोटे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

# पातुर पोलीस स्टेशनअंतर्गत गुरांच्या चोरीमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**पातुर:** शहरासह ग्रामीण भागात गोधन बकऱ्या चोरीच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अद्याप पर्यंत पातूर पोलिसांनी एकाही चोरीचा छडा लावला नाही, ज्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये पातुर पोलीस विषयी प्रचंड रोष निर्माण झाला आहे. गेल्या महिन्याभरामध्ये पातूर पोलीस स्टेशन अंतर्गत देऊळगाव, पातुर शहरातील रेस्ट हाऊस परिसर, समी प्लॉट ,अकबर प्लॉट ,बोडखासह अनेक गावातील गोधन व बकऱ्या चोरी गेले आहेत याबाबत अनेक तक्रारी पातुर पोलिसात दाखल असून अद्याप पर्यंत या चोरीचा तपास योग्य दिशेने पातुर पोलिसांनी केला नाही पातुर पोलीस स्टेशन अंतर्गत प्रचंड प्रमाणात अवैध व्यवसाय चालू असून याकडे दुर्लक्ष करीत चोऱ्याच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पातुर पोलिसांवर वरिष्ठ यांची मेहरबानी असल्याने पातुर पोलिसांचा मनमानी कारभार चालू असून काही बीट मध्ये कर्मचारी नसल्याचे बोलले जाते. पातूर पोलीस स्टेशन मध्ये कामाचा योग्य अभाव नसल्याने गुन्हेगारी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून हाणामाऱ्या ,चोऱ्या अवैध व्यवसाय प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे.

**चोरीच्या घटनांमध्ये वाढ**

पातुर तालुक्यातील विविध गावांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून गुरांच्या चोरीच्या घटना वाढल्या आहेत. शेतकरी रात्रीच्या वेळी आपल्या शेतात आणि गोपाळत असताना गुरांच्या चोरीच्या घटना घडत आहेत. चोरट्यांनी आता गावातील घरांवरही चोरी करायला सुरुवात केली आहे.

**पोलीस प्रशासनावर प्रश्नचिन्ह**

अद्याप पर्यंत पातुर पोलिसांनी एकाही चोरीच्या घटनेचा छडा लावला नाही, ज्यामुळे पातुर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. शेतकरी आणि नागरिक पातुर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर नाराज आहेत.
पातुर पोलिसांनी तातडीने कारवाई करून चोरट्यांना पकडावे आणि चोरीला गेलेल्या गुरांना मालकांच्या ताब्यात द्यावे, अशी मागणी शेतकरी आणि नागरिकांकडून केली जात आहे. या घटनेनंतर पातुर पोलिसांनी कडक पावले उचलावीत आणि चोरट्यांना पकडून चोरीच्या घटना थांबवाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली



प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर:** अजितदादा पवार यांना तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, संभाजी ब्रिगेड, मराठा सेवासंघ तसेच वीर भगतसिंग मित्र मंडळाच्या वतीने भगतसिंग चौक बायपास येथे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

शिवसेना तालुका प्रमुख गजानन चौधरी व संभाजी ब्रिगेड अमरावती विभागीय कार्याध्यक्ष संजय गुप्ता यांनी आयोजित कार्यक्रमात शिवसेना जिल्हा उपप्रमुख चंद्रकांत तिवारी, शिवसेना शहर प्रमुख विनायक गुल्हाने, शेतकरी सेना तालुका प्रमुख अरविंद तायडे, बाळासाहेब खांडेकर,राष्ट्रवादी नेते बोळे, श्रीधर कांबे , ॲड. भूषण काळे यांनी अजितदादा पवार यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. श्रद्धांजली वाहिली. अजितदादा अमर रहे अशा घोषणा दिल्या. मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# स्व. अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर:** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रीय अध्यक्ष (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) स्व.अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन व हरार्पण करून सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस उपाध्यक्ष संदीप पाटील जळमकर यांनी आयोजित केलेल्या श्रद्धांजली सभेत नगराध्यक्ष हर्षल साबळे, उपाध्यक्ष रोहित अव्वलवार, राष्ट्रवादी कांग्रेसचे तालुकाध्यक्ष मंगेश कुकडे,चंद्रकांत तिवारी, कैलास महाजन,सचिन गावंडे, यांनी स्व.अजितदादा पवार यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.



त्यानंतर अजितदादा अमर रहे च्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी नगरसेवक सचिन देशमुख नगरसेवक गंप्पू शर्मा, नगरसेवक गजानन नाकट, जगदीश मारोटकर, निळकंठ देशमुख, लाला डाबेराव, अब्दुल जावेद, राजू सदार, राजू कांबे, सरवर बेग,पप्पू मुळे, पंकज भटकर, भूषण काळे, बाळासाहेब खांडेकर, अमोल पिंपळे, विशाल शिरभाते, निलेश वानखडे, रवी मारकड,राम खंडारे, आर्यन तिडके,राम कांबे, शेळके काका,शंकर लिंगाटे, सोनू शर्मा, सागर निचड, आनंद बांगड, सुनील मोटे, तुषार भुयार, क्षीरसागर प्रामुख्याने उपस्थित होते. संचालन विष्णू लोडम यांनी केले.

# आकोलखेड येथे संत रविदास महाराज जयंती साजरी



प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**आकोट:** आकोलखेड येथे चर्मकार समाज मंडळ,संत रविदास दुर्गा पूजा मंडळ,संत रविदास गणोशोत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने संत रविदास महाराज यांच्या ६४९ व्या जयंती निमित्त गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.संत रविदास महाराज यांच्या विचारांवर चालण्याची गरज असल्याचे मत मान्यवरांनी मांडले. मिरवणूकीच्या सुरुवातीला संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले.मिरवणूकीमध्ये पो. पा. अमरनाथ शेगोकार, बँक अधिकारी गजानन देऊळकर,ग्रा.पं.सदस्या पार्वती पदमणे,ग्रा.पं.सदस्य श्रीहरी गाठेकर,सुरेश शेगोकार,गोपाल खंडारे,शंकर पदमणे,शौर्य बोचे यांच्या महिला मंडळ,बाल मंडळ आदींसह मुलं मुलींसह पुरुष व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी करता सर्व समाज महिला व पुरुष बांधवांनी परिश्रम घेतले.

# अपघातग्रस्त स्व. गोपाल चौरागडे यांच्या वारसांना एसबीआय कडून दोन लाखाचा धनादेश प्रदान

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी




**अकोट:** अकोली जहागीर येथील स्टेट बँकेचे खातेदार गोपाल बाबुराव चौरागळे यांचा २४ नोहेंबर २०२५ रोजी विद्युत शॉक लागून दुर्दैवाने मृत्यू झाला होता. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना अंतर्गत स्टेट बँकेने केवळ ४३६ रू. विमा काढला होता. गोपाल चौरागडे यांच्या मृत्यू नंतर अकोला येथील स्टेट बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक आशिष कुमार सिंग यांच्या मार्गदर्शनात अकोली जहा शाखेचे व्यवस्थापक मनमोहन प्रकाश यांच्या हस्ते अपघातग्रस्ताचे वारस संध्या चौरागडे यांना दोन लाख रुपये मदतीचा धनादेश ३१ जानेवारी रोजी सुपूर्द केला.

याप्रसंगी बँकेच्या कर्मचारी सुषमा, अजय भगत, प्रियंका ठाकूर, स्वप्नील पारस्कर, संतोष गेंद, शिवा बदरखे तसेच आकोलखेड येथील सीएसपी ग्राहक सेवा केंद्राचे मनोज दिवेकर उपस्थित होते. शाखा व्यवस्थापक मनमोहन प्रकाश यांनी आयुष्यात कधी काय होईल याची जाणीव नसल्याने अठरा १८ ते ५० पन्नास वर्षे वयोगटातील खातेदारांचा बँकेच्या वतीने वर्षासाठी केवळ ४३६ चा भरणा करून विमा काढला जातो. बँकेच्या खातेदारांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना अंतर्गत विमा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.गरीब कुटुंबाला आधार दिल्या त्याबद्दल बँक व त्यांच्या कर्मचाऱ्यांचे परिसरामध्ये कौतुक होत आहे.

# नियमित लसीकरणाचे उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण करा- जिल्हाधिकारी वर्षा मीना

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी



**अकोला:** नियमित लसीकरणाचे उद्दिष्ट मार्चअखेरपर्यंत १०० टक्के पूर्ण करावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले. जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत जिल्हा लसीकरण टास्क फोर्स, जिल्हास्तरीय लोकसंख्या धोरण समन्वय समिती, जन्ममृत्यू नोंदणी जिल्हास्तरीय समन्वय समिती आदी विविध बैठका आज झाल्या, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, शिक्षणाधिकारी रतनसिंह पवार, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर, तसेच तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

लसीकरण कार्यक्रमात बीसीजी, पोलिओ, हिपॅटायटिस बी, रोटाव्हायरस, पेन्टावॅलेंट, पीसीव्ही, एमआर, डीपीटी आदी ८ लसी दिल्या जातात. लसीकरण कार्यक्रमानुसार जिल्ह्यात ३१ हजार ३६८ उद्दिष्टापैकी २३ हजार ३६८ लसीकरण डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण झाले आहे. उर्वरित लसीकरण विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी दिले.

# डॉ. जगन्नाथ ढोणे विद्यानिकेतन मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन साजरे

वि. प्रतिनिधी ३ फेब्रुवारी




**अडगाव:** डॉ. जगन्नाथ ढोणे विद्यानिकेतनच्या प्रांगणात वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य संजय निमकर्डे तर उद्घाटक म्हणून निलेश देऊळकार, पोलिस पाटील हितेश हागे, सरपंच शोभाताई खंडारे, आदिवासी आश्रम शाळा अधीक्षिका इंगळे मॅडम व विद्यानिकेतन मुख्याध्यापिका ढोकणे हजर होते.

एसएससी जीडी मध्ये निवड झालेले शुभम संजय इंगळे ( सीआरपीएफ) शिवा भगवान अवचार ( सीआरपीएफ) यश वासुदेव नेमाडे (एसएसबी) यांचा शाळेतर्फे शाल ,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला .विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमातून त्यांच्या कलागुण व संस्कृतीचे दर्शन घडवले. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाली. सुरुवातीला स्वागतम सुस्वागतम या नृत्याने सर्वांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन मोदे मॅडम यांनी तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका ढोकणे मॅडम यांनी केले.

आभार प्रदर्शन राखोंडे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता खिरोडकार मॅडम, वानखडे, किरण ताठे ,दिपाली ताठे, प्रांजली वानखडे, प्राजक्ता वानखडे, रत्नाताई भड यांनी परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. ०३ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# दोन जणांकडून धारदार चाकू जप्त

## आर्म ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल

प्रतिनिधी ३ जानेवारी

**यवतमाळ :** शहरातील किटीकेअर हॉस्पिटल परिसरात दहशत निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्त कारवाई करत दोन इसमांकडून धारदार चाकू जप्त केले. या प्रकरणी दोघांविरुद्ध आर्म ॲक्ट व मुंबई पोलीस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आली.

गणेश भैयालाल सकट (वय २६, रा. नेताजीनगर, यवतमाळ) व सागर रामदास चौधरी (वय ४०, रा. मन्यायर ले-आऊट, यवतमाळ) अशी आरोपींची नावे आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, किटीकेअर हॉस्पिटल परिसरात दोन इसम हातात मोठे धारदार चाकू घेऊन संशयास्पदरीत्या फिरत आहेत. या माहितीच्या आधारे वरिष्ठांच्या सूचनेनुसार पंचनामा करून कारवाई करण्यात आली.

पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेत पाण्याच्या टाकीजवळ उभ्या असलेल्या दोन इसमांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी आपली नावे गणेश भैयालाल सकट (वय २६, रा. नेताजीनगर, यवतमाळ) व सागर रामदास चौधरी (वय ४०, रा. मन्यायर ले-आऊट, यवतमाळ) अशी सांगितली. पंचासमक्ष अंगझडती घेतली असता गणेश सकट याच्याकडून ६१ सेमी लांबीचा तर सागर चौधरी याच्याकडून ३६ सेमी लांबीचा लोखंडी धारदार चाकू मिळून आला.



या दोघांकडे शस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. जप्त करण्यात आलेल्या दोन्ही चाकूंची एकूण किंमत सुमारे १ हजार रुपये असून ते पंचासमक्ष सील करून ताब्यात घेण्यात आले. शस्त्रे कुठून आणली व कशासाठी वापरणार होते, याबाबत विचारणा केली असता आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे दिली व सहकार्य केले नाही. याप्रकरणी अवधुतवाडी पोलीस ठाण्यात पोहवा सचिन घुगे यांच्या तक्रारीवरून आरोपी गणेश सकट व सागर चौधरी यांच्याविरुद्ध कलम ४/२५ आर्म ॲक्ट तसेच कलम १३५ मुंबई पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ येथील पोहवा सचिन घुगे (तक्रारदार) यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. त्यांना चार्ली इन्चार्ज पोहवा आशिष गुल्हाने, पोलीस शिपाई सुहास उईके व पोलीस शिपाई पवन भुरके यांनी सहकार्य केले.

## व्यावसायिकाची फसवणूक

प्रतिनिधी ३ जानेवारी

**यवतमाळ :** व्यवसायाशी संबंधित महागड्या मशिन्स आपल्या नावावर करून देतो, अशी खोटी बतावणी करत शहरातील एका व्यावसायिकाची तब्बल २२ लाख ९५ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. हे प्रकरण पोलिसांत दाखल होताच छत्तीसगड येथील एका आरोपीविरुद्ध १ फेब्रुवारी रोजी तातडीने गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अंकुश विजय कोटेचा (वय ३३, रा. प्रगती सोसायटी, यवतमाळ) असे फसवणूक झालेल्या व्यावसायिकाचे नाव असून, जसपालसिंग (वय ५५, रा. आमडीगनर, भिलाई, जि. दुर्ग, छत्तीसगड) असे आरोपीचे नाव आहे. मे २०२४ मध्ये दोघांमध्ये व्यवसाय व्यवहारासंदर्भात चर्चा झाली होती. त्यावेळी आरोपीने खोटे दस्तावेज तयार करून ८ लाख २५ हजार रुपये किमतीची जेसीबी मशिन तसेच १४ लाख ७० हजार रुपये किमतीची सेल्फ लोडिंग मिक्सर मशिन कोटेचा यांच्या नावावर करून देतो, असे सांगून एकूण २२ लाख ९५ हजार रुपये घेतले.

मात्र २०२६ उजाडूनही मशिन न दिल्याने फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. यानंतर कोटेचा यांनी अवधूतवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# सीमावर्ती भागात दारु तस्करीचा स्फोट

## ७७ लाखांची विदेशी दारु जप्त; उमरखेडमध्ये 'सुरक्षा कवच'?

प्रतिनिधी ३ जानेवारी

**उमरखेड :** विदर्भ–मराठवाडा सीमावर्ती भागात अवैध व बनावट दारू तस्करीने अक्षरशः कळस गाठला असून, नांदेड राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या मोठ्या कारवाईमुळे या काळ्या धंद्याचे भयावह वास्तव पुन्हा एकदा उघड झाले आहे. नांदेड–उमरखेड मार्गावर गोवा बनावटीच्या विदेशी मद्यासह तब्बल ७६ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मात्र उमरखेड तालुक्यात सुरू असलेल्या दारूच्या खुलेआम व्यवहारांकडे संबंधित यंत्रणा डोळेझाक का करत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

■ नांदेड उत्पादन शुल्क विभागाने केलेली कारवाई प्रभावी ठरली असली, तरी उमरखेड तालुक्यातील अवैध दारू विक्रीबाबत अद्याप ठोस हालचाल दिसत नाही. महात्मा गांधी तंटामुक्ती व स्वच्छता अभियान पुरस्कार प्राप्त गावांच्या परिसरातही दारू विक्री सुरू असल्याचे आरोप होत आहेत. यामुळे 'कारवाई निवडक आणि तस्करी सर्वत्र' असे चित्र निर्माण झाले असून, स्थानिक यंत्रणांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.



हदगाव तालुक्यातील गोजेगाव शिवारात नांदेड उत्पादन शुल्कच्या भरारी पथकाने सापळा रचत अशोक लेलँड कंटेनर (MH 40 CD 2107) अडवला. झडतीदरम्यान गोवा बनावटीची विदेशी दारू, बियर तसेच देशी दारूचे तब्बल ११४५ बॉक्स आढळून आले. यामध्ये रॉयल स्टॅग, ओसी ब्लू, बडवायजर, ट्युबर्गसह विविध ब्रँडचा समावेश असून, दोन मोबाईल फोन व २० लाखांचे वाहन असा एकूण ७६ लाख ८२ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करून हदगाव न्यायालयात हजर केले असता, त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख व सह आयुक्त प्रसाद सुर्वे यांच्या आदेशानुसार, नांदेड विभागीय उपआयुक्त बी.एच. तडवी, अधीक्षक कदम एस.एल., उपअधीक्षक सागर शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गोपनीय माहितीनुसार ३१ जानेवारी रोजी सापळा रचून ही धडक देण्यात आली. दरम्यान, या तस्करीचे धागेदोरे उमरखेड तालुक्यापर्यंत पोहोचत असल्याची चर्चा असतानाही, यवतमाळ उत्पादन शुल्क विभाग व स्थानिक पोलिसांकडून ठोस कारवाई होत नसल्याने संशय अधिक बळावत आहे. उमरखेड पोलीस स्टेशन हद्दीत विविध ठिकाणी अवैध दारू विक्री खुलेआम सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः ब्राह्मणगाव–चातारी परिसर 'अवैध दारूचे कोठार' म्हणून ओळखला जात असून, बसस्थानक परिसरात कंट्री बारसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप होत आहे.

नांदेड विभागाने दाखवलेल्या धडक कारवाईमुळे सीमावर्ती भागातील दारू तस्करांमध्ये खळबळ उडाली असली, तरी उमरखेड तालुक्यात मात्र कारवाईचा अभाव का, असा प्रश्न सुज्ञ नागरिक विचारत आहेत. यवतमाळ उत्पादन शुल्क विभागाने नांदेडचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ठोस पावले उचलल्यासच बनावट दारूच्या साखळीला आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नंददीप फाउंडेशनला ब्राझील व बेल्जियमच्या अभ्यासकांची भेट; सेवाकार्याचे कौतुक

प्रतिनिधी ३ जानेवारी

**यवतमाळ :** नंददीप फाउंडेशन बेघर मनोरुग्ण निवारा केंद्राला आज ब्राझील आणि बेल्जियम येथील दोन आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी भेट देऊन संस्थेच्या कार्याची पाहणी केली. डायट कॉलेजचे माजी प्राचार्य माननीय डॉ. प्रशांत गावंडे यांच्या पुढाकाराने ही भेट घडून आली.

यावेळी बेल्जियमचे समाजशास्त्राचे प्राध्यापक डॉ. फ्रेडरिक तसेच ब्राझीलच्या अर्थशास्त्र प्राध्यापिका डॉ. सिंथींया यांनी निवारा केंद्रातील कार्य, उपचारपद्धती, पुनर्वसन प्रक्रिया आणि सेवाव्रतींचे योगदान यांची माहिती घेतली. बेघर मनोरुग्णांच्या पुनर्वसनासाठी सुरू असलेल्या उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले.



डॉ. प्रशांत गावंडे यांनी इंग्रजी भाषेत फाउंडेशनच्या विविध प्रकल्पांची माहिती देत संस्थेची कार्यपद्धती समजावून सांगितली.

यानंतर दूरदर्शन जिल्हा प्रतिनिधी आनंद कसंबे यांनी तयार केलेली नंददीप फाउंडेशनवरील माहितीपट पाहून विदेशी पाहुणे भारावून गेले. फाउंडेशनला नुकतेच मिळालेल्या आंतरराष्ट्रीय पुरस्काराबद्दल त्यांनी अभिनंदन व्यक्त केले असून या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी डायटचे माजी प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे, डॉ. सुशील बत्तलवार, फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप शिंदे, नंदिनी शिंदे, संजय बोरगावकर, बबन घोडेस्वार, गौरी बोटरे, निकिता, सविता मडावी, प्रिया बागडे आदी उपस्थित होते.

नंददीप फाउंडेशनच्या वतीने या विशेष भेटीबद्दल डॉ. प्रशांत गावंडे यांचे आभार व्यक्त करण्यात आले असून, या पाहुण्यांच्या शब्दांनी सेवाव्रतींना नव्या उत्साहाची प्रेरणा मिळाल्याचे संस्थेच्या प्रतिनिधींनी सांगितले.

## वरळी मटका खेळणाऱ्यांवर छापा, तिघांना ताब्यात

प्रतिनिधी ३ जानेवारी

**मुळावा :** सार्वजनिक ठिकाणी पैशांची बाजी लावून वरळी मटका जुगार खेळणाऱ्या तिघांवर पोफाळी पोलिस ठाण्याच्या पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत एकूण ६ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२ (अ) अन्वये करण्यात येऊन पोफाळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शनिवारी (ता. ३१) दुपारी तीन ते साडेतीनच्या सुमारास मुळावा बसस्थानकाजवळ सार्वजनिक ठिकाणी वरळी मटका सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार छापा टाकून सय्यद सलीम सय्यद हमीद (वय ४०, रा. शांतिनगर, मुळावा), बाबुराव गायकवाड व अशोक संगुळे (दोघेही रा. मुळावा) यांना ताब्यात घेण्यात आले.

# जिल्ह्यात 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती व 'कुसुम' अभियान

प्रतिनिधी ३ जानेवारी

**पुसद :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीच्या औचित्याने तसेच कुष्ठरोग निवारण दिनाच्या निमित्ताने यवतमाळ जिल्ह्यात ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान व 'कुसुम' मोहिमेचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचा उद्देश समाजात कुष्ठरोगाबाबत असलेले गैरसमज दूर करणे, सामाजिक भेदभाव कमी करणे आणि नवीन रुग्ण शोधण्यावर विशेष भर देणे आहे, असे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी निर्देशित केले.

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात समन्वय समितीची बैठक पार पडली.

यामध्ये जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. गोपाळ पाटील आणि इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत अभियानाचे नियोजन, जनजागृती उपक्रम व सर्वेक्षण यावर सविस्तर चर्चा झाली.



अभियानाअंतर्गत शाळा व महाविद्यालयांमध्ये कुष्ठरोग प्रतिज्ञा वाचन, प्रभात फेरी, प्रश्नमंजुषा, रांगोळी व निबंध स्पर्धा यांसह जनजागृती केली जाणार आहे.

ग्रामसभांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन वाचून सरपंच व स्थानिक प्रतिनिधींमार्फत तळागाळापर्यंत संदेश पोहोचवला जाईल. 'कुसुम' मोहिमेत वीटभट्टी, खाण, ऊसतोड व बांधकाम कामगार तसेच स्थलांतरित नागरिक यांच्या वस्त्यांमध्ये आरोग्य कर्मचारी व स्वयंसेवक घरपोच तपासणी व सर्वेक्षण करतील.

कुष्ठरोगाचे निदान व उपचार सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत उपलब्ध आहेत. बहुविध औषधोपचार पद्धती (MDT) वापरल्यास १०० टक्के बरा होऊ शकतो, असे डॉ. सुभाष ढोले यांनी सांगितले. त्यांनी कुठलाही भेदभाव न करता रुग्णांना सन्मानाने वागवण्याचे आवाहन केले. शरीरावर फिकट अथवा तांबूस रंगाचा संवेदनाशून्य डाग आढळल्यास तात्काळ जवळच्या रुग्णालयात तपासणी करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

"कुष्ठरोगावरील भेदभाव समाप्त करूया, सन्मानाने जगू देऊ या," हा अभियानाचा मुख्य संदेश असून नागरिकांनी यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे प्रशासनातर्फे आवाहन करण्यात आले आहे.

## शेतातील तुरीच्या गंजीला आग

प्रतिनिधी ३ जानेवारी

**नेर :** तालुक्यातील पांढरी शेतशिवारात रात्री अज्ञात व्यक्तीने शेतातील तुरीच्या गंजीला आग लावल्याची घटना घडली. या आगीत अंदाजे १५ ते २० क्विंटल तूर पूर्णपणे जळून खाक झाली असून सुमारे दोन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

गोवर्धन रामराव पवार असे नुकसानग्रस्त शेतकऱ्याचे नाव आहे. कष्टाने आणि खर्च करून पिकवलेली तूर जळाल्याने शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसला आहे. सदर आग ही जाणीवपूर्वक लावण्यात आल्याची शक्यता परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली असून, घटनेची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

# अजितदादा पवार यांचे अस्थी कलश यवतमाळात दाखल; दोन दिवस दर्शनासाठी उपलब्ध

प्रतिनिधी ३ जानेवारी

**यवतमाळ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अजितदादा पवार यांच्या अस्थींचा कलश अमरावती येथून यवतमाळ शहरात दाखल झाले आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी यवतमाळ जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सार्वजनिक दर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कामारकर पाटील यांनी दिली.



अस्थी कलशाचे आगमन (दि. २) सायंकाळी सात वाजता दारव्हा रोडवरील हाऊसिंग फायनान्स कार्यालयात झाले आहे. त्यानंतर ३ व ४ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा ते सायंकाळी सात वाजेपर्यंत सर्व नागरिकांना अस्थी कलशाचे दर्शन घेता येणार आहे. रयतेच्या हितासाठी आणि राज्याच्या विकासासाठी कार्य केलेल्या या लोकनेत्याला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पाटील यांनी केले आहे.

# युरियासाठी शेतकऱ्यांची फरफट

## कृषी केंद्रांची 'सेटिंग' राज, अधिकारी गाफील!

प्रतिनिधी ३ जानेवारी

**उमरखेड :** तालुक्यात युरिया खताचा तुटवडा दिवसेंदिवस तीव्र होत असून ग्रामीण व शहरी भागातील शेतकरी कृषी केंद्रांच्या उंबरठ्यावर हेलपाटे मारताना दिसत आहेत. लाखो रुपये खर्च करून हरभरा, गहू आदी पिकांची पेरणी तसेच ऊसाची लागवड केलेल्या शेतकऱ्यांसमोर आता खताअभावी पिकांची वाढ खुंटण्याचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे.

■ उमरखेड विधानसभेचे आमदार किसन वानखेडे यांनी युरिया खताच्या तुटवड्याची तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे. ज्या कृषी केंद्रांकडून शेतकऱ्यांना खत नाकारले जात आहे किंवा गैरव्यवहार होत आहे, त्यांच्यावर कठोर कारवाई करावी व शेतकऱ्यांना त्वरित युरिया उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

युरिया मिळावा म्हणून शेतकरी कृषी केंद्रांभोवती चकरा मारत आहेत, मात्र अनेक ठिकाणी "खत नाही" असे सांगत हात रिकामे परत पाठवले जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे काही कृषी केंद्रांकडे युरिया उपलब्ध असतानाही तो सर्वसामान्य शेतकऱ्यांना न देता ओळखीच्या व संबंधित व्यक्तींना अतिरिक्त दराने विक्री केली जात असल्याची चर्चा तालुक्यात जोर धरू लागली आहे.

गरजू शेतकरी वंचित राहत असताना कृषी केंद्रांची मनमानी वाढली असून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कृषी विभागाचा कुठलाही वचक उरलेला नसल्याचे चित्र आहे. या सर्व प्रकाराकडे उमरखेडचे तालुका कृषी अधिकारी निष्क्रिय भूमिका घेत असल्याचा आरोप शेतकऱ्यांतून होत आहे. तात्काळ दखल घेऊन सर्व शेतकऱ्यांना न्याय्य पद्धतीने युरिया खताचा पुरवठा करावा, अशी आर्त मागणी शेतकरी करीत आहेत.

# विमानवारी : महादीप परीक्षेत यश भोयर प्रथम

प्रतिनिधी ३ जानेवारी

**झरी-जामणी :** झरी तालुक्यातील खातेरा येथील गुणवंत विद्यार्थी यश नारायण भोयर याने महादीप परीक्षेत तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावत विमानवारीसाठी निवड मिळविल्याने त्याचा जाहीर सत्कार करण्यात आला.

हा सत्कार माजी आमदार वामनराव कासावार यांच्या हस्ते पार पडला. यावेळी यश भोयर याला शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह तसेच स्पर्धा परीक्षेची पुस्तके देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास राजू येल्टीवार (य. जी. म. स. बँक, वणी विभागीय अध्यक्ष), सुनील ढाले, निलेश येल्टीवार, विनोद गोडे, राहुल धांडेकर, प्रशांत बघेले, अरविंद भेदोडकर, भुमारेड्डी बाजनलावार, अमोल ठाकरे, सचिन टाले, मनोज अडपावार यांच्यासह काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आणि खातेरा गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महादीप परीक्षा ही यवतमाळ जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणारी उपक्रमशील परीक्षा असून, या परीक्षेत फक्त जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थीच सहभागी होऊ शकतात. यश भोयर यांच्या या यशामुळे खातेरा गावासह संपूर्ण झरी तालुक्यातून त्यांचे कौतुक होत आहे.

## पारधी समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना

प्रतिनिधी ३ जानेवारी

**यवतमाळ :** प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा यांच्या मार्फत पारधी विकास योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात पारधी समाजातील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनात्मक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येणार आहे. तसेच शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने ही योजना लागू करण्यात आली आहे.

ही योजना पांढरकवडा प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या यवतमाळ, राळेगाव, कळंब, बाभुळगाव, मारेगाव, वणी, केळापूर, झरी जामणी व घाटंजी या तालुक्यांतील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय, अनुदानित तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशित पारधी समाजातील विद्यार्थ्यांसाठी लागू राहणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांची दरमहा किमान ८० टक्के उपस्थिती आवश्यक आहे. इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना दरमहा ७०० रुपये, तर इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा १ हजार रुपये प्रोत्साहनात्मक शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते किंवा पालकांसोबत संयुक्त खाते असणे आवश्यक असून संबंधित विद्यार्थ्यांचे नाव बँक पासबुकवर असणे बंधनकारक आहे. अर्जासोबत बँक पासबुक व आधार कार्डच्या झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे. मुख्याध्यापकांकडून प्रमाणित यादीनुसार पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट निधी जमा करण्यात येणार आहे.

## जाहीरनामा

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते, अर्जदार- माधव कोंडबा पावडे रा.टेंभी ता महागांव जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुली करीता कु.प्रतिक्षा माधव पावडे हिचा जन्म/सचिव ग्रा.पचायत टेंभी ता. महागांव येथे दि. 18/05/2012 रोजी झाला आहे, परंतु त्यांच्या जन्माची नोंद. सचिव. ग्रा.पचायत टेंभी नगरपंचायत, महागांव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13 (3) नगरपंचायत, महागांव यांना जन्म नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

शिक्का

**स्वा./-**
**तहसीलदार साहेब**
**तहसिल कार्यालय महागाव**

५

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि. ३ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या ; अपघाताला आमंत्रण

**मंगरूळपीर :** शहरात मोठ्या प्रमाणात- मोकाट गुरांचा सुसाट असून भर रस्त्यामध्ये आपले बस्तान मांडत असून नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष असून मुख्याधिकारी मोकाट गुरांमुळे अपघाताला आमंत्रण असून मोकाट गुरांना दोरखंड बांधाल का असा सवाल शहरवासीय कडून होत आहे . शहरात मोकाट जनावरे सामुहिक रित्या रस्त्याच्या मधोमध बसल्यामुळे अनेक अपघात घडले आहे. जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिकेने पुढाकार घेवून जनावरांच्या मालकांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. या जनावरांसाठी कोंडवाड्याची सुविधा करावी. मंगरूळपीर शहरात ठिकठिकाणी मोकाट गुरांचा ठिय्या असून मोकाट गुरे भर रस्त्यावर बसने,रस्त्यावर वावरणे इत्यादी कारणां मुळे वाहतुकीस अडथळा येत असून किरकोळ अपघात घडत आहेत तसेच शहरात घाण होत आहे.

# आदेशाचे धडकले पत्र, सुरू झाले कारवाईचे सत्र !

*अखेर शेलुखडसे येथील पोकरा गैरप्रकरणात कार्यवाही करण्याचे आदेश.
*अमरावती विभागीय कृषी सहसंचालक यांचे पत्र.
*क्षेत्रीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या कर्तव्यातील कसूराचा मागितला अहवाल.
*ठिंबक संच, विहिरी आणि ईतर घटकातील गैरप्रकाराची तक्रार लोकायुक्तांकडे करण्यात येणार

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात खळबळ उडवून देणाऱ्या शेलुखडसे येथील बहुचर्चित पोकरा गैरप्रकरणात अखेर कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शेलुखडसे येथील तक्रार क्र. DIS/ADAF/WASH/ २०२५/३५ नुसार जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय यांचे पत्र क्र.४९/२०२६ आणि पत्र क्र.१०९/२०२६ संदर्भीय विषयान्वये प्राथमिक कार्यवाही करण्याचे पत्र विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वाशिम यांना दिले आहे.






विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांनी दिलेल्या कार्यवाही पत्र जा. क्र./ नादेकृसप्र/तक्रार/१७१/२०२६ पत्रात म्हटले आहे की, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत शेलुखडसे ता. रिसोड जि. वाशिम येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत श्री ज्ञानेश्वर गजानन खडसे आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करून शासनाची फसवणूक केल्याबाबत तसेच शेलुखडसे ग्रामपंचायत हद्दीत गावठाण क्षेत्रात विहीर खोदून कृषी विभागाच्या विविध योजनांचे अनुदान लाटल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. उपरोक्त विषयातआपले संदर्भीय पत्र क्र.२ व ३ चे अनुषंगाने प्राथमिक चौकशी अहवाल व अभिप्रायानुसार शेतकऱ्यांना लाभ देण्यात आलेल्या बाबींपैकी फळबाग लागवड योजना वगळता ईतर बाबी तपासणी दरम्यान आढळून आल्या आहेत. मात्र फळबाग लागवड ही बाब आढळून आली नाही.

त्यानुसार श्रीमती लक्ष्मी गजानन खडसे व मयत गजानन निवृत्ती खडसे यांनी सन सन २०२१ यावर्षी गट नंबर ६३३ मध्ये केलेली पेरू पिकाची लागवड केली नसल्याचे चौकशी अहवालात नमूद करण्यात आले आहे. सदर लाभार्थ्यांनी फळबाग लागवड अनुदानाचा स्वतंत्रपणे दोन प्रस्तावांद्वारे फळबाग लागवड अनुदानाचा लाभ घेतला आहे.

सदर बाब लक्षात घेता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा -२ फळबाग लागवड मार्गदर्शक सूचना मुद्दा क्र.५.४.८. विचारात घेऊन प्रस्तुत प्रकरणी पुढील अनुदान अदायगी थांबविणे तसेच अदा करण्यात आलेले अनुदान अनुक्रमे लाभार्थी व वारस यांच्याकडून वसुल करण्याबाबतची पुढील कार्यवाही तातडीने करण्यात यावी. आणि या प्रकरणाशी सबंधित क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी कर्तव्यात कसूर केला किंवा कसे ? या बाबत सखोल चौकशी करून या बाबतचा अहवाल विभागीय कृषी सहसंचालक अमरावती या कार्यालयास सादर करावा असे स्पष्ट निर्देश श्री. गणेश घोरपडे विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

### भरकटलेल्या तपासात अधिकारी व कर्मचारी यांना पाठीशी घालण्याचा केविलवाणा प्रयत्न

जिल्ह्यातील बहुचर्चित पोकरा गैरप्रकरणात सर्वांचेच हात ओले झाले असल्याची शक्यता वर्तवली जात होती. त्यामुळे थातुरमातुर चौकशी करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न सुरू झाला होता. मात्र सबळ पुरावे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे उपरोक्त बोगस फळबाग लागवड प्रकरण बाहेर आले आहे. परंतु चौकशी अधिकाऱ्यांनी काही बाबी आढळून आल्या असा उल्लेख केला. मात्र त्या नियमानुसार आहेत की नियमबाह्य आहेत याचा दिलेल्या अहवालात स्पष्ट उल्लेख नसल्याची बाब विभागीय कृषी सहसंचालक यांनी दिलेल्या कार्यवाहीच्या पत्रातून अधोरेखित होत आहे. परिणामी तपास अधिकारी यांनी सदर घोटाळा प्रकरणातील क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पाठराखण केली असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. भ्रष्टाचाऱ्यांना वाचविण्याचा हा केविलवाणा प्रयत्न जिल्हावासियांच्या जिव्हारी लागला असून तक्रारदार आता शेलुखडसे येथील गैरप्रकरणासह, तालुक्यातील भर जहाँगीर,मोप,मोरगव्हाण, बोरखेडी येथील अनेक पोकरा योजनेतील घोटाळ्याची पुराव्यानिशी तक्रार महाराष्ट्राचे लोकायुक्त यांच्याकडे करणार असल्याची माहिती समोर येत आहे. शिवाय सदर प्रकरण किसान काँग्रेसच्या सहकाऱ्याने आणि विरोधी पक्षाचे माध्यमातून विधान सभेत मांडण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर तक्रारदार या गंभीर प्रकरणाचा छडा लावण्यासाठी उच्च न्यायालयाचे खंडपीठ नागपूर उच्च न्यायालयात धाव घेणार असल्याची माहिती हाती आली आहे.




## थोडक्यात

### मानोरा तालुक्यात वृक्षांची कत्तल

**प्रशासन 'कोमात' तर तस्कर 'जोमात'**



●सिटी न्युज ब्युरो @ मानोरा●

तालुक्यातील सह अनेक गावातील आडजात झाडे वनतस्कर शेतकऱ्यांच्या धुर्यावरील विकत घेऊन विना परवानगी हिरवी कच्च झाडाची राजरोस पणे कत्तली सुरू असून याकडे वन विभागाचे अधिकारी वनपाल व वनरक्षक चिरीमिरी घेऊन याकडे दुर्लक्ष करतात.


एकी कडे शासन वृक्षारोपण करीत असताना मानोरा परिसरात दररोज शेकडो वृक्षांची कत्तल होत असून दिवसा वृक्षांची कत्तल केल्या नंतर वाहनात लाकडे टाकून नेत असताना सुद्धा ह्या तस्करकडे कोणत्या अधिकाऱ्याचे लक्ष का नाही गेल्या तीन चार महिन्या पासून वृक्षांची कत्तल होत असताना तस्करवर कारवाई होत नसल्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे याकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण झाडेच नामशेष होण्याची भीती निसर्ग प्रेमी कडून होत आहे काही जागरूक नागरिकांनी भ्रमणध्वनी वरून अधिकारी कर्मचारी यांना माहिती दिली किंवा शोशल मीडियाच्या माध्यमातून फोटो व माहिती पुरविली तर ती माहिती वनतस्कर ला पुरविली जाते व त्याला सावध करतात यावरून वृक्ष कटाई बाबत हे अधिकारी कर्मचारी किती जागरूक आहे हे समजून येते.



# मंगरूळपीर शहरातील शासकीय कार्यालयात घाणच घाण !

**➡ अनेक कार्यालय शौचालयाविना ➡ महिला कर्मचाऱ्यांची कुचंबना ➡ सर्वत्र घाणीचे साम्राज्य ➡ अनेक शौचालय पाण्याअभावी बंद**

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●



शहरातील शासकीय कार्यालयातील प्रसाधनगृह व शौचालयाची दुरावस्था तसेच काही कार्यालयातील शौचालये बंद असल्यामुळे महिला कर्मचाऱ्यांची मोठी कुचंबना होत असल्यामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

मंगरूळपीर शहरातील बहुतेक शासकीय कार्यालयामध्ये महिला कर्मचारी कार्यरत आहेत. प्रत्येक कार्यालयामध्ये महिलांसाठी वेगळे शौचालय असणे आवश्यक आहे. परंतु या नियमाला अधिन न राहता शहरातील बहुतेक कार्यालयातील शौचालये बंद स्थितीत असून यामुळे महिला कर्मचारी यांना मोठी पंचाहित होत असून या विषयी बरेचदा वरिष्ठालाही सांगितले परंतु वरिष्ठांनी या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केल्यामुळे महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मंगरूळपीर शहरातील पंचायत समिती कार्यालयामधील प्रसाधनगृह व शौचालयाची दुरावस्था झालेली असून घाणीचे साम्राज्य आढळून आले. येथील महिला कर्मचाऱ्यांच्या प्रसाधनगृहाचा दरवाजा तुटलेला असून त्या शेजारील कार्यालयामध्ये पुरूषांची वर्दळ होत असल्यामुळे महिलांची मोठी कुचंबना होत असून वरिष्ठही या विषयी अनास्था दाखवत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यासोबतच महिला व बालकल्याण विभाग मंगरूळपीर, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, मंगरूळपीर, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, लघुसिंचन विभागे, आदी कार्यालयामध्ये प्रसाधनगृह व शौचालयाची दुरावस्था झाली असून यामधील बहुतेक शौचालये बंद आहेत तर काही ठिकाणी पाणी नसल्यामुळे त्याचा वापर करणे बंद आहे. त्यामुळे महिला कर्मचारी यांना कार्यालयात शौचालय उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्यामध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. काही महिला कर्मचाऱ्यांना या गंभीर समस्येमुळे पोटाचे विकार उदभवले असून यासाठी कार्यालयाचे वरिष्ठही कुठलीच दखल घेत नसल्यामुळे महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे महिला कर्मचाऱ्यांनी सांगितले. एकीकडे घर तेथे शौचालय व कार्यालय तिथे शौचालयचा नारा गुंजत असतांना शासकीय कार्यालये या गोष्टीपासून वंचित असल्याचे दिसत आहेत. शौचालयासाठी शासकीय अनुदानातही वाढ केली. परंतु अजूनही १०० टक्के शौचालये व त्याचा नियमित वापर न होत असल्यामुळे या योजनेचा फज्जा उडाला आहे. यापासून शासकीय कार्यालयाची अवस्था काही वेगळी नाही. याविषयी वरिष्ठांशी संपर्क साधले असता सारवासारव तथा उडवाउडवीची उत्तरे प्राप्त झाली आहेत. त्यामुळे महिला कर्मचाऱ्यांच्या या महत्वपूर्ण तथा गंभीर समस्येवर त्वरीत उपाययोजना करावी व प्रत्येक सरकारी कार्यालयामधील प्रसाधानगृहे व शौचालये सुरू करावीत व तेथे पाण्याची सुध्दा व्यवस्था करावी अशी मागणी महिला कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

# जगण्याची कळ , महागाईची झळ !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जीवनाश्यक वस्तूचे दर गगनाला भिडले. व महागाईची आग झपाट्याने पेटत आहे. त्यामुळे महागाईची झळ अन् जीवनाची कळ होत आहे. इंधन दरवाढीने जीवनावश्यक वस्तुचे दर गंगनाला पोहोचले आहेत. बांधकाम साहित्याच्या दरवाढीमुळे सर्व सामान्यांचे घराचे स्वप्ने अधुरेच राहत आहेत.

### बांधकाम साहित्यासह जीवनावश्यक वस्तूचे दर गगनाला

सध्या सणसुदीचे दिवस असून बाजारपेठेत सर्वच जीवनावश्यक वस्तु सह भाजीपाल्याचेही दर भरमसाठ वाढले आहेत. ग्राहकांची वर्दळ आहे. ग्राहकाच्या या उत्साहामुळे बाजारपेठ फुलल्या आहेत. शहरातील मोठ्या बाजारात सुवर्ण झळाळी असल्याचे चित्र दिसते. शेंगदाणे तेलाच्या दरात किलोमागे सरासरी ३० ते ४० रुपयांची वाढ झाली आहे. बाजारपेठेमध्ये गुळ, नारळ,हरभरा आणि तेलाची मोठी आवक झाली आहे. मात्र ग्राहकांना दरवाढीची झळ बसली आहे.

घर बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या भावात दुप्पट तिप्पट वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना घरबांधणे आवक्याच्या बाहेर झाले आहेत. २०२२ पर्यंत सर्वांना घरे देण्याचे मोदी सरकारचे आश्वासन हवेतच विगळले. इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तुत अचाणक वाढ झाली आहे.



# अजितदादा पवार यांच्या निधनाने राज्यात शोककळा !

## केनवड येथे सर्वपक्षीय शोकसभा



●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या विमान दुर्घटनेत दुःखद निधन झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या अकस्मात निधनामुळे राजकारणासह समाजकारणातही एक कार्यक्षम, कणखर आणि अखंड कार्यरत राहणारे नेतृत्व हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

या दु:खद घटनेनंतर ३१ जानेवारी रोजी केनवड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेला केनवड सर्कलमधील सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. शोकसभेत बोलताना उपस्थित मान्यवरांनी अजितदादा पवार यांच्या कार्यशैलीचा भावनिक उल्लेख केला. 'अजितदादांचे कार्य असे होते की विमान अपघाताच्या वेळी त्यांच्या विमानातून सामान्य नागरिकांच्या कामांचे कागद उडाले. शेवटच्या क्षणापर्यंत जनतेच्या प्रश्नांसाठी काम करणारा हा नेता होता. असा दादा पुन्हा राजकारणात होणे कठीण आहे,' असे उद्गार यावेळी काढण्यात आले.वक्त्यांनी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या योजना, सिंचन व कृषी क्षेत्रातील निर्णय, तसेच प्रशासनातील शिस्त व कार्यक्षमतेचा गौरव केला. त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे आणि निर्णयक्षमतेमुळे ते सामान्य जनतेत लोकप्रिय होते, असे मतही व्यक्त करण्यात आले.शोकसभेचे वातावरण अत्यंत गंभीर आणि भावनिक झाले होते. अखेरीस सर्व उपस्थितांनी एक मिनिट मौन पाळून दिवंगत नेत्यास श्रद्धांजली अर्पण केली तसेच अजितदादा पवार यांच्या कुटुंबीयांप्रती मन:पूर्वक शोकसंवेदना व्यक्त करण्यात आल्या.

### रिसोड येथे संत रविदास महाराज जयंतीनिमित्त

# समाजाने काळानुसार अपडेट होणे गरजेचे- दिनकर कानडे

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

चर्मकार समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती रिसोड शहरात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. रिसोडच्या चर्मकार विकास प्रबोधिनीने पुढाकार घेत संत रविदास महाराज जयंती समारंभाचे आयोजन, संत सातारकर महाराज संस्थान रिसोड येथे केले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अर्जुन खिराडे तर प्रमुख पाहुणे म्हणून रिसोड शहराचे नगराध्यक्ष भगवान दादा क्षीरसागर, पीएसआय गोखले साहेब, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष गजानन खंदारे मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवाजी कव्हर तसेच व शांतता कमिटीचे अध्यक्ष समाजसेवक श्री मंचकराव जाधव, संत सातारकर महाराज संस्थानचे अध्यक्ष दत्तराव देशमुख, रिसोड नगर परिषद उपाध्यक्ष विष्णू भाऊ कदम, नगरसेवक संतोषराव च-हाटे, संजय बगडिया उपस्थित होते. विचार मंचावर चर्मकार समाजातील काही ज्येष्ठ मंडळी उपस्थित होती.कार्यक्रमाचे उद्घाटन सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. प्रास्ताविका मधून दिनकर कानडे यांनी, चर्मकार समाजाने सांप्रत काळानुसार अपडेट होणे गरजेचे आहे




असे प्रतिपादन केले.नंतर समाजातील बालवक्त्यांनी संत रविदास महाराज यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली. मुख्याध्यापक श्री राधाकिसन झुंजारे सर यांनी, मान्यवरांना रिसोडचे चर्मकार बांधव गेल्या आठ वर्षापासून समाज मंदिरासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.संभाजी ब्रिगेडचे श्री गजानन खंदारे यांनी आपल्या मनोगतात, महाराष्ट्राच्या महान संत परंपरेची माहिती सर्वांना दिली. तालुकाध्यक्ष श्री शिवाजी कव्हर सर यांनी, आपण थोर महान संतांना, नेत्यांना जातीच्या चौकटीत बंद केले, याबद्दल विचार होऊन परिस्थिती बदलणे गरजेचे आहे. असे महत्त्वाचे आवाहन केले. रिसोड शहराचे नगराध्यक्ष श्री भगवानदादा क्षीरसागर यांनी आपल्या भाषणात, संत रविदास महाराजांची जयंती अतिशय शांतपणे व नियोजनबद्ध व वैचारिक पद्धतीने साजरी केल्याबद्दल चर्मकार समाजाचे कौतुक केले तसेच चर्मकार समाजाच्या रिसोड येथे रविदास भवनाच्या मागणीचा विषय मार्गी लावू, असे आश्वासन दिले. पीएसआय श्री गोखले साहेब यांनी, समाजातील बाल वक्त्यांना व्यासपीठावर बोलण्याची संधी देऊन त्यांच्यात सभाधिटपणा निर्माण करण्याचा प्रयत्न केला याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.याप्रसंगी चर्मकार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि सेवानिवृत्त समाज बांधवांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमस्थळी समाजातील महिलांनी सुंदर रांगोळीची आरास केली.कार्यक्रमाचे बहारदार संचलन सचिव श्री शंकर गायकवाड सर यांनी केले. तर आभार प्रा. पानझाडे सर यांनी मानले.कार्यक्रमासाठी रिसोड मधील सर्व चर्मकार समाज बांधव आणि भगिनी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी चर्मकार विकास प्रबोधिनीचे अध्यक्ष श्री पांडुरंग घायाळ, एकनाथ खिराडे, रमेश खिराडे, विजय झुंजारे, गणेश घायाळ,आत्माराम निळे, प्रदीप खिराडे सर,पंढरी राजगुरू, संतोष वानरे सर, प्रमोद कानडे विजय राजगुरू आणि रिसोड मधील सर्व समाज बांधवाचे मोलाचे सहकार्य लाभले. शेवटी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# जिल्ह्यातील 224 ग्रामपंचायतींवर येणार प्रशासकराज

## ग्राम विकास विभागाचे निर्देश, जिल्हा परिषद कधी नेमणार प्रशासक

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अकोला :** जानेवारी ते डिसेंबर २०२६ दरम्यान मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचे निर्देश राज्याच्या ग्रामविकास विभागाने २३ जानेवारी रोजी काढलेल्या पत्रात सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या सीईओ यांना दिले आहे. त्यानुसार जिल्ह्यातील २२४ ग्रामपंचायतींची मुदत देखील फेब्रुवारी महिन्याच्या अखेर संपणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ग्रामपंचायत निवडणूक विभागाकडून प्राप्त झाली आहे.

ग्रामपंचायत निवडणुकांचा मोठा टप्पा आगामी काळात येत असून फेब्रुवारी २०२६ अखेर जिल्ह्यातील २२४ ग्रामपंचायतची मुदत संपणार आहे. या सर्व ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच थेट जनतेतून निर्वाचित होणार आहे. यासंबधी आरक्षण प्रक्रिया देखील याआधीच जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान संबंधित ग्रामपंचायतीवर प्रशासक नेमण्याचे आदेश २३ जानेवारी रोजी ग्रामविकास विभागाने



काढले. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणूक लांबणीवर पडली आहे. तत्पूर्वी जिल्हा परिषदेच्या निवडणूकांची मुदत देखील वर्ष झाले संपली असून निवडणुकीची प्रतीक्षा आहे.

दरम्यान वीस ग्रामपंचायतची मुदत दोन वर्षापासून संपली असून याठिकाणी प्रशासकराज असून विस्तार अधिकाऱ्यांची

### फेब्रुवारीत मुदत संपणाऱ्या ग्राम पंचायत मध्ये

तेल्हारा तालुक्यातील ३४, अकोट ३८, मूर्तिजापूर २९, बाळापूर ३७, बार्शीटाकळी २७, पातूर २३, अकोला ३६ ग्राम पंचायतींचा समावेश आहे.

नियुक्ती केली आहे. त्यामुळे मुदत संपलेल्या ग्रामपंचायत निवडणुका एकाच टप्प्यात प्रशासन घेईल असा अंदाज आहे. १ जानेवारी ते ४ मार्च २०२४ मध्ये मुदत संपलेल्या जिल्ह्यातील २० ग्रामपंचायत मध्ये प्रशासकराज असून याठिकाणी दोन वर्षापासून निवडणुकीची प्रतीक्षा आहे. जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील उमरी, अकोली रूपराव अकोट मधील केळपाणी, केळपाणी बु, मूर्तिजापूर मधील कव्हळा, शेलू बाजार, किनखेड, लंघापूर बाळापूर- हिंगणा, निंबा, शिंगोली, बार्शिटाकळी, भेंडीसूत्रक, चोहोगांव, पातूर- सांगोळ, कोठारी बु., आस्टुल, भंडारज बु. तुलंगा बु., अकोला आखतवाडा, अनकवाडी मजलापूर या ग्रामपंचायतीचा समावेश आहे.

# अकोल्याचा युवक अमरावतीत रस्ते अपघातात जखमी

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अकोला :** सिव्हिल लाईन परिसरात राहणारा मुकेश यादव हा युवक कामानिमित्त अमरावतीला गेला होता. राजकमल ब्रिजजवळ त्याचा भीषण अपघात झाला. या अपघातात मुकेश गंभीर जखमी झाला असून त्याला एका अनोळखी व्यक्तीने तातडीने अमरावतीच्या इर्विन रुग्णालयात दाखल केले आहे.

सध्या मुकेशची प्रकृती चिंताजनक असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. मुकेशला रुग्णालयात भरती करणाऱ्या व्यक्तीने मुकेशचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केला आहे, जेणेकरून त्याच्या कुटुंबीयांना या घटनेची माहिती मिळावी. कोणी या युवकाला ओळखत असेल, तर त्याच्या नातेवाईकांशी संपर्क साधून त्यांना तातडीने अमरावतीच्या इर्विन रुग्णालयात पोहोचण्यास सांगावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# शहरात अवैध धंदे, वरलीची चलती

♦ जवाहर नगर चौक, गांधी चौक परिसरात सर्रास



प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अकोला :** शहरात वरळी मटका खुलेआम सुरु आहे. असा नागरिकांचा आरोप आहे. वरळी मटक्यांना स्थानिक तपास यंत्रणेतील कोणाचा आशिर्वाद आहे असा प्रश्न उपस्थित होत असून वरिष्ठ याकडे लक्ष देतील काय अशी विचारणा होत आहे.

वरळी मटका शहरात खुलेआम पणे सुरु आहे अशी अकोलेकरांची ओरड आहे. महापालिका निवडणूकीनंतर देखील तपास यंत्रणा गाफील आहे की गाफील केली गेली असा प्रश्न उपस्थित होत आहे. चौका चौकात सुरु असलेले वरळी मटक्यांना तपास यंत्रणेतील नेमक्या कोणाचे आशिर्वाद आहे. स्थानिक पातळीवर तपास यंत्रणेच्या दूर्लक्षामुळे वरळी मटका जोरात सुरू असल्याची ओरड होत आहे. जवाहर नगर चौक असो की जुने शहर की गांधी चौक या ठिकाणी वरळी मटका जोरात सुरु असून स्थानिक पातळीवर कोणाच्या दूर्लक्षामुळे आणि खुलेआम अवैध धंदे सुरु आहे याची विचारणा होत आहे.

# राज राजेश्वर नगरीत श्याम ध्वजा निशाण पदयात्रेचे भव्य स्वागत

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी



**अकोला :** नूतन वर्षाच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही राज राजेश्वर नगरीतून राजस्थानातील खाटू धामकडे निघालेल्या द्वितीय भव्य श्री श्याम ध्वजा निशाण पदयात्रेचे अकोला शहरात आगमन झाल्यावर अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. ही पदयात्रा २ जानेवारी रोजी अकोल्यातून सुरू झाली असून सुमारे ११०० किलोमीटरचा प्रवास करत खाटू धाम येथे पोहोचणार आहे.

सोमवारी सायंकाळी सुमारे ४ वाजता ही पदयात्रा शहरालगत डाबकी रोडवरील अनोखा हनुमान मंदिरात दाखल झाली. यावेळी श्री श्याम भक्तांकडून फटाक्यांची आतषबाजी, फुलांची उधळण तसेच भक्तीमय भजनांच्या गजरात पदयात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. सर्वप्रथम श्री श्याम बाबांच्या मनोहारी मूर्तीची विधीवत पूजा-अर्चा करण्यात आली. यानंतर शेकडो भाविक भक्तांनी हरिनाम कीर्तन व मधुर भजनांच्या तालावर नृत्य करत पदयात्रेत सहभाग घेतला. सर्व ११ पदयात्री श्री श्याम बाबांच्या रथासह नगर भ्रमणासाठी रवाना झाले. ही पदयात्रा डाबकी रोड नंदाने मंगल कार्यालय, कस्तुरबा गांधी चौक, भीम नगर चौक, विठ्ठल मंदिर, जय हिंद चौक, वडे राम मंदिर, कापड बाजार, गांधी चौक, सिटी कोतवाली, खोलेश्वर येथील परशुराम मार्ग मार्गे गीता नगरमधील श्री साई बाबा व रामदेव बाबा मंदिरात पोहोचली. तेथे महाआरतीनंतर पदयात्रेचा समारोप करण्यात आला. संपूर्ण मार्गावर भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती आणि परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

# ग्रामीण आरोग्य सेवेत अनियमितता प्राथमिक आरोग्य केंद्रातही सावळागोंधळ


प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अकोला :** ग्रामीण आरोग्य सेवेत मोठ्या प्रमाणात अनियमितता सुरू असल्याचा आरोप करत, मुख्यालयी न राहणाऱ्या आरोग्य सेवक, आरोग्य सहाय्यक व मेडिकल ऑफिसर यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोर धरू लागली आहे.

या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी यांना अनेकदा निवेदन देण्यात आले. परंतु त्यावर कोणतीही कारवाई आजपर्यंत झाली नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र तसेच ग्रामीण रुग्णालयांमध्ये कार्यरत अनेक कर्मचारी मुख्यालयी न राहता शहरात राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर वैद्यकीय सेवा मिळत नाही. चोहोट्टा बाजार, धाबा, पारस तसेच पिंजर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. रुग्ण जेव्हा पीएचसी मध्ये उपचारासाठी येतात त्यावेळी पीएचससीला कुलूप लागलेले असते. ही बाब अत्यंत गंभीर असून याबाबत वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बी. आर. हायस्कूल समोरच्या रस्त्याचे काम अर्धवट

♦ केवळ मुरूम पसरवून ठेवला डांबरीकरण नाही



प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अकोला :** बी. आर. हायस्कूल कडून मुख्य डाकघराकडे जाणारा रस्ता खूप खराब झाला होता. रस्त्यावर चालणे देखील कठीण झाले होते. या बाबतीत ओरड झाल्यावर रस्ता दुरूस्ती करण्यात आली परंतु ती देखील अर्धवट आहे. सध्या केवळ मुरूम टाकला आहे. त्यामुळे वाहन चालकांची गैरसोय होत आहे. राहिलेले काम तातडीने करण्यात यावे अशी मागणी आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर रहदारी असते. बाजूलाच शाळा, चिवचिव बाजार आहे. त्यामुळे हा रस्ता व्यवस्थित राहणे आवश्यक आहे. रस्त्याचे काम जेव्हा हाती घेतले तेव्हा त्याची पूर्तता व्हायला हवी होती. परंतु घिसाडघाईत काम पूर्ण झाले नाही. या रस्त्याचे डांबरीकरण तातडीने करून सध्या होत असलेली गैरसोय दूर करावी अशी मागणी केली जात आहे.

# आरोपी कडून साडेचार लाखाचा गांजा जप्त

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

♦ स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**अकोला :** स्थानिक गुन्हे शाखेने जुने शहर पोलिस स्टेशनच्या हद्दीत एका इसमाकडुन ४,५७,५००/- रूपये किंमतीचा १८.३८० किलो गांजा व दोन मोटार सायकल असा ५,६७,५००/ रू किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

स्थानिक गुन्हे शाखा पथकाला माहिती मिळाली कि, पो.स्टे. जुने शहर हद्दीत अकोला पातुर रोडवरील चांदुर फाटया लगत अमनदिप हॉटेलच्या बाजुला काही इसम अंमली पदार्थ गांजा बाळगून आहेत. पोलिसांनी पंचासमक्ष रेड करून आरोपी अनीस खान इमाम खान, वय ३८ वर्ष, रा. छबनमा नगर, खैर मोहम्मद प्लॉट अकोला यास ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातुन १८ किलो ३८० ग्रॅम गांजा व दोन मोटार




सायकल असा ५,६७,५००/ मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द एन.डी.पी.एस. ॲक्ट अन्वये कारवाई करून आरोपीस जुने शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा निरीक्षक शंकर शेळके यांच्या नेतृत्वाखाली पथकाने कारवाई केली.

# वहदत-ए-इस्लामी अकोला तर्फे नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन ; 250 हून अधिक रुग्णांनी घेतला लाभ

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

**अकोला :** सामाजिक बांधिलकी जपत वहदत-ए-इस्लामी हिंद आणि वहदत फाउंडेशन अकोला यांच्या वतीने शहरातील प्रसिद्ध अमरीन उर्दू हायस्कूल, अकोट फाईल येथे भव्य मोफत नेत्र तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात २५० हून अधिक रुग्णांच्या डोळ्यांची सखोल तपासणी करण्यात आली.

या शिबिरात प्रामुख्याने प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. सय्यद इमरान (एमएस ऑप्थाल्मॉलॉजी) आणि 'इनसाइट आय हॉस्पिटल'च्या अनुभवी टीमने सेवा दिली. तसेच, डॉ. सरोश खान यांनीही रुग्णांची तपासणी करून त्यांना डोळ्यांच्या आरोग्यासाठी योग्य सल्ला दिला.



तपासणीनंतर १०० हून अधिक गरजू रुग्णांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच, सर्व रुग्णांना मोफत औषधे आणि आय-ड्रॉप्स देण्यात आले. शिबिरादरम्यान ज्या रुग्णांमध्ये मोतिबिंदूची लक्षणे आढळली, त्यांच्या शस्त्रक्रियेसाठी अत्यंत कमी खर्चात व्यवस्था करण्यात आली आहे. अत्याधुनिक मशीनद्वारे डोळ्यांचे नंबर आणि इतर आजारांची अचूक तपासणी करण्यात आली. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी वहदत-ए-इस्लामी आणि वहदत फाउंडेशन अकोलाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोलाचे योगदान दिले. सकाळपासूनच रुग्णांची नोंदणी, उपचार आणि मार्गदर्शन यासाठी सर्व सदस्यांनी समर्पित भावनेने काम केले. स्थानिक नागरिकांनी वहदत-ए-इस्लामी, वहदत फाउंडेशन आणि डॉक्टरांच्या टीमच्या या स्तुत्य उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. आरआरसी न्यूजसाठी अकोला, महाराष्ट्र येथून युसूफ शेख यांचा विशेष रिपोट.

# कुख्यात गुंड जयराज पांडे एक वर्षासाठी स्थानबद्ध

**अकोला :** येथील धोकादायक इसम म्हणून कुख्यात जयराज सतीश पांडे (२८) रा. रघुवंशी मंगल कार्यालयासमोर, नेकलेस रोड, रतनलाल प्लॉट, अकोला याला एमपीडीए कायद्यान्वये एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले.

जयराज पांडे याच्यावर यापूर्वी जबरी चोरी, घातक शस्त्रांनी हल्ला, घरफोडी, गृहअतिक्रमण, शांतताभंगाच्या उद्देशाने धाकदपटशा, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, हद्दपार आदेशाचे उल्लंघन, रात्रीच्या वेळी घरफोडी, इतरांच्या जीवितास व वैयक्तिक सुरक्षिततेस धोका निर्माण करण्याचा आरोप होता. त्याला संधी देऊनही सुधारणा न झाल्याने कारवाई केली. जिल्हादंडाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कारवाई करत जयराज पांडे याला जिल्हा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलिस निरीक्षक शंकर शेळके यांच्यासह पोलीस निरीक्षक मालती कायटे आदींनी कारवाई केली.


CLASSIFIED





# अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे सर्वपक्षीयांनी घेतले दर्शन

प्रतिनिधी ३ फेब्रुवारी

आ. सुलभाताई खोडके जनसंपर्क कार्यालयात दादांच्या स्मृतीचे स्मरण करून भावपूर्ण श्रद्धांजली
महाराष्ट्राच्या राजकारणातील अजातशत्रू स्व.अजितदादा पवार यांना अमरावतीमध्ये सर्वपक्षीय मानवंदना

**अमरावती:** दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांच्या अस्थीकलशाचे दर्शन घेण्यासाठी सोमवारी आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालयात जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते तसेच शेकडो चाहत्यांनी मोठी गर्दी केली.यावेळी अस्थिकलशाचे विधिवत पूजन, दादांच्या पवित्र स्मृतींचे स्मरण करत, भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महासचिव आ.संजय खोडके यांनी सहा जिल्ह्यांचे अस्थिकलश आणले होते. संबंधित जिल्हा



प्रमुखांना ते सोपविण्यात आले. सर्व शोकमग्न मंडळींनी आ. सुलभाताई खोडके व आ.संजय खोडके, यश खोडके यांची भेट घेऊन सांत्वन केले.

आ.संजय खोडके यांनी अजितदादा पवार यांच्या सोबत असलेल्या आठवणींना उजाळा दिला. मंगळवारी पहाटे गुरुकुंज मोझरी येथील पवित्र कुंडात अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे विधिवत विसर्जन करण्यात आले.

अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे दर्शन व आदरांजली वाहण्यासाठी माजी मंत्री वसुधाताई देशमुख, आचार्य कमलाताई गवई, गझलनवाज भीमराव पांचाळे, भाजप चे शिवराय कुलकर्णी, तुषार भारतीय, किरण पातुरकर, दिनेश सूर्यवंशी, माजी महापौर चेतन गावंडे, सुरेखाताई लुंगारे, श्रीचंद तेजवानी, माजी उपमहापौर चेतन पवार, सुनील खराटे, आशिष अतकरे, ऋषी खत्री, काँग्रेसचे माजी महापौर मिलिंद चिमोटे, विलास इंगोले ,जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष हरिभाऊ मोहोड, प्रा.संजय शिरभाते , मनोज भेले, सुरेश रतावा, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रा.डॉ.हेमंत देशमुख, नितीन हिवसे, प्रहार जनशक्ती पार्टीचे जितूभाऊ दुधाने, बंटी रामटेके, नंदकिशोर कुईटे, शिवसेना नगरसेवक मंजुषाताई जाधव, वायएसपीचे नागरसेवक प्रा. प्रशांत वानखडे, राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे सुरेखाताई ठाकरे, संतोष महात्मे, डॉ.गणेश खारकर, प्रशांत डवरे, अविनाश मार्डीकर, ॲड. किशोर शेळके, सौ. रिनाताई नंदा, मनीष बजाज, मंगेश मनोहर, भूषण बनसोड , अशोक बसेरिया , एपीएमसी संचालक प्रफुल्ल राऊत यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### अस्थिकलश विविध जिल्ह्यात रवाना

◆ वर्धा जिल्ह्याचा अस्थिकलश माजी आमदार राजू तिमांडे, जिल्हा प्रमुख शरद शहारे, ॲड. सुधीर कोठारी, राणाजी नन्नावरे यांच्याकडे सुपूर्द केला. तसेच वाशीम जिल्ह्याचा अस्थिकलश घेऊन राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांचे बंधू राम ठाकरे रवाना झाले. बुलढाणा येथील राष्ट्रवादी अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष ॲड. नाझर काझी, अकोला जिल्ह्याचा अस्थिकलश आ.अमोल मिटकरी यांचे स्वीय सहाय्यक स्वप्नील थोरात व शैलेश वानखडे , यवतमाळ जिल्हाध्यक्ष वसंतराव घुईखेडकर यांच्याकडे तर अमरावती जनसंपर्क कार्यालयात दर्शनासाठी ठेवला होता.







हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK